दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रु. ५.००। अंक १४

। शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ । पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com


## डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती दिनी २७ डिसेंबर 'कृषी विद्यार्थी दिन' साजरा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : देशाचे पहिले केंद्रीय कृषीमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी शिक्षण, संशोधन आणि शेतकरी हितासाठीचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त २७ डिसेंबर हा दिवस 'राज्य ॲग्रीकॉस – कृषी विद्यार्थी दिन' म्हणून घोषित करण्याचा निर्णय कृषी क्षेत्रातील विद्यार्थी, संशोधक आणि युवकांना प्रेरणा देणारा ठरेल. या माध्यमातून कृषी शिक्षण आणि संशोधनातील योगदानाचा गौरव होईल, असा विश्वास कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला. डॉ. पंजाबराव ऊर्फ भाऊसाहेब देशमुख यांच्या जयंतीनिमित्त २७ डिसेंबर हा दिवस कृषी विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्यात यावा, अशी राज्यातील ॲग्रीकॉस विद्यार्थ्यांची गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी होती. अखेर या मागणीला यश आले असून, महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाने २७ डिसेंबर हा दिवस 'राज्य ॲग्रीकॉस – कृषी विद्यार्थी दिन' म्हणून घोषित करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय २२ ऑक्टोबर २०२६ रोजी जारी करण्यात आला आहे. हा निर्णय राज्यातील कृषी विद्यार्थ्यांसाठी आनंदाची आणि अभिमानाची बाब ठरणार आहे.



# जरांगेंच्या ध्वनिफितीने महायुतीत खळबळ!

### ५०० कोटींच्या आरोपावरून शिंदेसेना-भाजप आमनेसामने

### आशीष शेलारांकडून सत्यता तपासण्याची मागणी, रामदास कदमांचा भाजप नेत्यांवर दावा







### ध्वनिफितीतील लोक भाजपचे?

रामदास कदम यांनी ही ध्वनिफीत दोन-अडीच वर्षांपूर्वीची असल्याचा दावा करत, ती आताच का समोर आली, असा सवाल केला. ध्वनिफितीतील संभाषण करणारे लोक भाजपचेच असल्याचे त्यांनी म्हटले. त्यातील महिलेने श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून पैसे पोहोचल्याचा उल्लेख केला असल्यास संबंधित महिला कोण आहे, पैसे कुणी दिले आणि एवढी मोठी रक्कम कुठून आली, याची चौकशी झाली पाहिजे, असे कदम म्हणाले. आपल्याकडेही जरांगे-पाटील यांच्या गोपनीय बैठकीतील संभाषणाची ध्वनिफीत असल्याचा दावा त्यांनी केला.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी कथित ५०० कोटी रुपयांच्या व्यवहाराचा उल्लेख असलेली ध्वनिफीत पत्रकार परिषदेत ऐकवल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. या ध्वनिफितीत श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून जरांगे-पाटील यांच्यापर्यंत ५०० कोटी रुपये पोहोचल्याचा उल्लेख असल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणावरून भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या नेत्यांमध्ये परस्परविरोधी भूमिका समोर आल्या आहेत. भाजपचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी ध्वनिफितीची सत्यता अद्याप सिद्ध झालेली नसल्याचे सांगत सखोल चौकशीची मागणी केली, तर शिवसेनेचे नेते रामदास कदम यांनी ध्वनिफितीतील आवाज भाजपच्या नेत्यांचे असल्याचा दावा केला आहे.

शेलार यांनी संबंधित ध्वनिफीत खरी की बनावट, ती तयार करण्यासाठी कोणते तंत्रज्ञान वापरले गेले आणि ती जरांगे-पाटील यांच्यापर्यंत कशी पोहोचली, याची कायदेशीर पद्धतीने चौकशी करण्याची मागणी केली. ध्वनिफितीतील संभाषणाशी भाजप सहमत नसल्याचे स्पष्ट करत त्यांनी भाजपच्या कोणत्याही नेत्याचा आवाज त्यात नसल्याचा दावा केला. पुराव्यांची पडताळणी होण्यापूर्वी निष्कर्ष काढणे चुकीचे असल्याचे सांगत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे निर्देश द्यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली. महायुतीत कोणतीही दरी किंवा दबाव (पान ४ वर)



शिंदेंच्या शिवसेनेकडून ऑडिओ क्लिप प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली. यावेळी विधानपरिषदेचे उपसभापती सचिन अहिर, खासदार मिलिंद देवरा, माजी खासदार राहुल शेवाळे,आमदार राहुल पाटील, खासदार रवींद्र वायकर, दीपक सावंत उपस्थित होते.

### 'आंदोलन बदनाम करण्याचे षडयंत्र'

आपल्याविरोधात गेल्या तीन वर्षांपासून षडयंत्र सुरू असून मराठा आंदोलन बदनाम करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप जरांगे-पाटील यांनी केला. मराठा समाजाने प्रत्येक विधानाकडे लक्ष द्यावे, असे आवाहन करत त्यांनी कथित ध्वनिफीत पुरावा म्हणून सादर केल्याचे सांगितले. या प्रकरणी देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी लक्ष घालावे, अशी मागणीही त्यांनी केली.

## महत्वाचे...

### अपक्ष उमेदवारी... कराळे गुरुजींची सहा वर्षांसाठी हकालपट्टी




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नागपूर** : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आक्रमक नेते नितेश कराळे गुरुजी यांची पक्षातून सहा वर्षांसाठी हकालपट्टी करण्यात आली आहे. नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक अपक्ष लढवण्याची घोषणा केल्याने पक्षाने त्यांच्यावर ही कारवाई केली.

या मतदारसंघातून काँग्रेसने विद्यमान आमदार अभिजित वंजारी यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे, तर भाजपने आमदार सुधाकर कोहळे यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. या पार्श्वभूमीवर कराळे गुरुजी यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याने पक्षशिस्तीचा भंग केल्याचा ठपका ठेवत त्यांची हकालपट्टी करण्यात आली. दरम्यान, कराळे गुरुजी यांनी मागील निवडणुकीतही या मतदारसंघातून अपक्ष म्हणून नशीब आजमावले होते.

त्यावेळी त्यांना सुमारे साडेआठ हजार मते मिळाली होती. ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले होते. आता पुन्हा अपक्ष उमेदवारी जाहीर केल्याने त्यांच्या राजकीय भूमिकेकडे लक्ष लागले आहे.

# इथेनॉल उत्पादन बंदीवर केंद्राचे शिक्कामोर्तब!

### महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना ७ हजार कोटींचा फटका? ४० हजार कोटींची गुंतवणूक संकटात; उसाच्या रसासह बी-हेवी मळीपासून उत्पादनालाही मनाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली** : साखर उद्योगाला मोठा धक्का देणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. इथेनॉल पुरवठा वर्ष २०२६-२७ मध्ये उसाचा रस आणि बी-हेवी मळीपासून इथेनॉल उत्पादन करण्यास साखर कारखाने व आसवनी प्रकल्पांना बंदी घालण्यात आली आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे महाराष्ट्रातील साखर उद्योगासमोर आर्थिक संकट उभे राहण्याची शक्यता असून, राज्यातील कारखान्यांचा सात हजार कोटी रुपयांहून अधिक महसूल बुडण्याचा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या अन्न व सार्वजनिक वितरण विभागाने २२ ऑक्टोबर रोजी यासंदर्भातील आदेश जारी केले. त्यानुसार, १ नोव्हेंबर २०२६ ते ३१ ऑक्टोबर २०२७ या इथेनॉल पुरवठा वर्षात साखरेचे इथेनॉलमध्ये रूपांतर करता येणार नाही. उसाचा रस आणि बी-हेवी मळीचा वापर करून इथेनॉल निर्मिती करण्यासही मनाई करण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या पूर्वीच्या इथेनॉल धोरणाला प्रतिसाद देत महाराष्ट्रातील साखर कारखान्यांनी इथेनॉल निर्मिती प्रकल्पांमध्ये सुमारे ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली आहे. मात्र, नव्या निर्णयामुळे या गुंतवणुकीच्या परताव्याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. इथेनॉल निर्मितीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होण्याची शक्यता असल्याने कारखान्यांच्या आर्थिक गणितावरही त्याचे परिणाम होऊ शकतात. देशात आणि राज्यात अपुरा पाऊस तसेच एल निनोच्या प्रभावामुळे उसाच्या उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देशांतर्गत साखरेचा पुरवठा कायम ठेवणे आणि संभाव्य दरवाढ रोखणे, या उद्देशाने केंद्राने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे. मात्र, इथेनॉल उत्पादनासाठी पर्यायी कच्चा माल वापरण्याबाबत तसेच अन्य प्रकारच्या मळीपासून इथेनॉल निर्मितीसंदर्भातील नियमांबाबत आदेशात स्पष्टता नसल्याने साखर उद्योगात संभ्रम निर्माण झाला आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे साखर कारखान्यांच्या आर्थिक नियोजनावर परिणाम होण्याची शक्यता असून, आगामी हंगामात उद्योगाची भूमिका काय असेल, याकडे लक्ष लागले आहे.

# सिस-पे घोटाळा : तलाठ्याला अटक; ११५ कोटींच्या मालमत्ता जप्तीला मंजुरी!

### महिन्याला ८ ते १० टक्के परताव्याचे आमिष; आणखी ६० कोटींच्या मालमत्तांसाठी पुरवणी प्रस्ताव

श्रीगोंदा । दादा सोनावणे

**श्रीगोंदा** : महिन्याला आठ ते दहा टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून हजारो गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या सिस-पे गुंतवणूक प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यात तलाठी म्हणून कार्यरत असलेल्या दशरथ विठ्ठल रोडे (रा. वडाळी रोड, श्रीगोंदा) याला अहिल्यानगरच्या आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने अटक केली आहे. न्यायालयाने त्याला २७ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, सुमारे ११५ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्तीच्या प्रस्तावाला राज्य शासनाने मंजुरी दिली असून, आणखी ६० कोटींच्या मालमत्तांसाठी पुरवणी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

एक लाख रुपयांच्या गुंतवणुकीवर दरमहा आठ ते दहा टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवून सिस-पे, इन्फिनिटी, बिकन आणि ग्लोबल ट्रेडिंग आदी कंपन्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक गोळा केल्याचा आरोप आहे. सुरुवातीला काही गुंतवणूकदारांना परतावा देऊन विश्वास संपादन करण्यात आला. मात्र, पुढे परतावा बंद झाल्याने अनेक गुंतवणूकदार आर्थिक (पान ४ वर)




### १७५ कोटींच्या मालमत्तांवर कारवाईची शक्यता

गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी ११५ कोटी रुपयांच्या मालमत्ता जप्तीच्या प्रस्तावाला शासनाची मंजुरी मिळाली आहे. आणखी ६० कोटींच्या मालमत्तांसाठी पुरवणी प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. त्यालाही मंजुरी मिळाल्यास कारवाईची व्याप्ती वाढणार आहे.

# विखे-पाटील-थोरातांच्या सहमतीचे राजकारण; जिल्हा बँकेत ११ जागा बिनविरोध

### जामखेडमध्ये विखे-शिंदे गटांची मोट; सहकाराच्या निवडणुकीत समन्वयाचे चित्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत सहमती आणि समन्वयाचे राजकारण पुढे आले असून, एकूण २१ जागांपैकी ११ जागांवर उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्याशी संबंधित राजकीय प्रवाहांमधील समन्वयाची चर्चा, तसेच जामखेडमध्ये विखे पाटील आणि सभापती प्रा. राम शिंदे यांच्या गटांमध्ये जुळलेली समीकरणे, या निवडणुकीची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली आहेत.

जिल्हा बँक ही शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून देण्यासह सहकारी संस्थांना आर्थिक पाठबळ देणारी जिल्ह्यातील महत्त्वाची संस्था आहे. त्यामुळे बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. यंदाच्या निवडणुकीत २१ पैकी ११ जागांवर बिनविरोध निवड झाल्याने अनेक ठिकाणी निवडणुकीतील चुरस टळली आहे. स्थानिक राजकीय समीकरणे, सहकारी संस्थांमधील प्रभाव आणि परस्पर समन्वयातून या जागांवर सहमती घडून आल्याचे चित्र आहे.




**विखे-पाटील-थोरात समीकरणाची चर्चा**

अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात राधाकृष्ण विखे पाटील आणि बाळासाहेब थोरात हे दोन प्रमुख नेते आहेत. दोन्ही नेत्यांच्या राजकीय भूमिका वेगवेगळ्या असल्या, तरी सहकारी संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार समन्वयाची समीकरणे तयार होत असतात. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत झालेल्या बिनविरोध निवडींमुळे या समीकरणांची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. सहकार क्षेत्रातील प्रतिनिधित्व निश्चित करताना स्थानिक नेतृत्व आणि परस्पर सहमतीला महत्त्व मिळाल्याचे या निवडणुकीतून दिसून येते.

**जामखेडमध्ये विखे-शिंदे एकत्र**

जामखेडमधील सचिन घुमरे यांची बिनविरोध निवडही राजकीयदृष्ट्या लक्षवेधी ठरली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि सभापती प्रा. राम शिंदे यांच्या (पान ४ वर)

# साखर कामगार बेमुदत संपावर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : राज्यातील साखर कामगारांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवार, २२ ऑक्टोबरपासून बेमुदत संप पुकारला आहे. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळ आणि महासंघाच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या या आंदोलनामुळे अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर उद्योगाचेही लक्ष कामगारांच्या मागण्यांकडे लागले आहे. थकीत वेतनाचा प्रश्न, बंद व आजारी साखर कारखाने सुरू करणे, कंत्राटी कामगारांना योग्य वेतनश्रेणी लागू करणे आणि साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करणे, या प्रमुख मागण्यांसाठी कामगारांनी संपाचे हत्यार उपसले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सहकार क्षेत्राला मोठी परंपरा असून साखर कारखाने हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे केंद्र आहेत. राहुरी, श्रीरामपूर, प्रवरा परिसर, कोपरगाव आणि संगमनेर तालुक्यांसह जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये साखर उद्योगाशी संबंधित रोजगार आणि आर्थिक व्यवहार अवलंबून आहेत. त्यामुळे साखर कामगारांच्या संपाकडे केवळ कामगारांचा प्रश्न म्हणून न पाहता त्याचे उद्योग आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरील संभाव्य परिणामही महत्त्वाचे ठरणार आहेत.

**एक हजार कोटींचे वेतन थकीत**

राज्यातील साखर कामगारांचे एक हजार कोटी रुपयांहून अधिक वेतन थकीत असल्याचा दावा कामगार संघटनांनी केला आहे. हे थकीत वेतन तातडीने मिळावे, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. अनेक कामगारांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह साखर कारखान्यांतील रोजगारावर अवलंबून असतो. त्यामुळे वेतन रखडल्यास कुटुंबांच्या दैनंदिन खर्चासह शिक्षण, आरोग्य आणि इतर गरजांवर परिणाम होतो. थकीत वेतनाचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी या आंदोलनातून करण्यात येत आहे.

# ज्ञानेश कुमारांविरोधातील ठरावावर नियमानुसारच निर्णय!

### विरोधकांच्या प्रस्तावावर लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांची भूमिका; विशेष अधिवेशनाबाबत मात्र मौन

### मतदारसंघ फेररचनेच्या घटनादुरुस्तीची चर्चा; राहुल गांधींच्या निमंत्रणाबाबतही संदिग्धता

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नवी दिल्ली** : केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटविण्यासाठी विरोधकांकडून संभाव्य ठराव आणण्याच्या हालचालींच्या पार्श्वभूमीवर लोकसभाध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसदीय प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील पदच्युतीचा ठराव असो किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरोधातील महाभियोग प्रस्ताव, त्यावर घटनात्मक तरतुदी आणि संसदीय नियमांनुसारच कार्यवाही केली जाईल, असे बिर्ला यांनी स्पष्ट केले. त्यामुळे विरोधकांनी प्रस्ताव संसदेत आणल्यास त्यावरील पुढील निर्णय कोणत्या प्रक्रियेनुसार होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

'ब्रिक्स' संसदीय मंचाच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत बिर्ला यांनी ही भूमिका मांडली. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार असल्याचे सांगतानाच, पदच्युती किंवा अविश्वासाच्या ठरावासाठी निश्चित प्रक्रिया असून तिचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. विरोधकांचा प्रस्ताव प्रत्यक्ष संसदेत मांडला गेल्यानंतरच त्यावर नियमानुसार कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

लोकसभेच्या मतदारसंघांची फेररचना करण्यासंदर्भातील घटनादुरुस्ती विधेयक (पान ४ वर )

### ब्रिक्स संसदीय परिषदेकडे जगाचे लक्ष

नवी दिल्लीत २६ आणि २७ ऑक्टोबर रोजी बारावी ब्रिक्स संसदीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ब्रिक्स सदस्य आणि भागीदार देशांचे संसदीय नेते व प्रतिनिधी या परिषदेत सहभागी होणार आहेत. लोककेंद्रित विकास, संसदीय सहकार्य, द्विपक्षीय संबंध आणि जागतिक प्रश्नांवर या परिषदेत चर्चा होणार असल्याची माहिती बिर्ला यांनी दिली. परिषदेच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### राहुल गांधींच्या निमंत्रणाबाबत संभ्रम कायम

संसदीय मैत्री गटांच्या अध्यक्षांना निमंत्रित करण्यात आले असले, तरी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या सहभागाबाबत बिर्ला यांनी स्पष्ट भूमिका मांडली नाही. त्यामुळे राहुल गांधी यांना ब्रिक्स संसदीय परिषदेसाठी अधिकृत निमंत्रण देण्यात आले आहे की नाही, याबाबतचा संभ्रम कायम आहे.

# महाराष्ट्रात वर्षभरात ४० जैविक वायू प्रकल्प!

### कृषी अवशेष, शहरांतील सेंद्रिय कचऱ्यापासून इंधननिर्मिती

### आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई** : नैसर्गिक वायूची आयात आणि परदेशी पुरवठादारांवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी महाराष्ट्रात जैविक वायू निर्मितीला चालना देण्यात येणार आहे. पुढील वर्षभरात राज्यात ३० ते ४० संपीडित जैविक वायू (सीबीजी) प्रकल्प उभारण्याचे नियोजन असून, यामध्ये महानगरपालिकांचाही समावेश असेल. मुख्य सचिव राजेश अग्रवाल आणि महाराष्ट्र संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी ही माहिती दिली.

केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय आणि भारत पेट्रोलियमच्या सहकार्याने मुंबईत आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. कृषी अवशेष आणि नागरी सेंद्रिय कचऱ्यापासून जैविक वायू निर्मिती करून ऊर्जा क्षेत्रातील परावलंबित्व कमी करण्यावर यावेळी भर देण्यात आला.

मुख्य सचिव अग्रवाल यांनी सांगितले की, शहरांतील घनकचऱ्याचे शास्त्रीय व्यवस्थापन ही पर्यावरण संरक्षण आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची गरज आहे. राज्यातील सात महानगरपालिकांमध्ये भारत पेट्रोलियमच्या सहकार्याने प्रकल्प उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने नाममात्र एक रुपया मोबदल्यात जमीन हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पुढे नेली आहे. केंद्राच्या आर्थिक सहाय्याचाही प्रकल्पांसाठी उपयोग करण्यात येणार आहे.

परदेशी यांनी सांगितले की, (पान ४ वर)

### विदर्भात प्रकल्पांना गती

वर्धा, चंद्रपूर, नागपूर आणि नांदेड जिल्ह्यांत तीन ते चार प्रकल्पांची प्रक्रिया पुढे गेली असून, काही प्रकल्प उत्पादनाच्या टप्प्यात असल्याचे परदेशी यांनी सांगितले. प्रकल्पांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हानिहाय ऑनलाइन माहिती फलकही विकसित करण्यात येणार आहेत.

# पैसा नव्हे, पशुधन वाचवा !

## चारा अनुदान, चारा डेपो की छावण्या? दुष्काळ निवारणासाठी स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेण्याची गरज




दुष्काळ पडला की पाण्याचा प्रश्न ऐरणीवर येतो, शेतातील पिके जळून जातात आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहते ते पशुधनाच्या संगोपनाचे संकट! शेतकऱ्यांसाठी जनावरे ही केवळ मालमत्ता नसतात, तर त्यांच्या जगण्याचा आधार असतात. दूध, शेतीची कामे, शेणखत आणि त्यातून मिळणारे उत्पन्न अशा अनेक मार्गांनी पशुधन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देते. त्यामुळे दुष्काळात पशुधन वाचविणे म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा टिकविणे होय. अशा परिस्थितीत राज्यात चारा छावण्या सुरू करायच्या, चारा डेपो उभारायचे की पशुपालकांच्या खात्यावर थेट चारा अनुदान जमा करायचे, यावर सुरू असलेले विचारमंथन महत्त्वाचे आहे. मात्र, याचा निर्णय केवळ प्रशासकीय सोय, खर्चाची बचत किंवा राजकीय गणिते पाहून नव्हे, तर प्रत्यक्ष परिस्थितीचा अभ्यास करूनच घ्यावा लागेल.

दुष्काळात मदत करण्यासाठी एकच उपाय सर्वत्र लागू करणे ही सर्वांत मोठी चूक ठरू शकते. राज्यातील प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक गावात चाऱ्याची उपलब्धता सारखी नसते. काही भागांत चारा उपलब्ध असतो; मात्र वाढलेल्या दरांमुळे पशुपालकांना तो विकत घेणे परवडत नाही. काही भागांत चारा कमी असतो, पण बाहेरून आणणे शक्य असते. तर काही ठिकाणी चाऱ्याचा पूर्ण तुटवडा असतो आणि वाहतूक करणेही आर्थिकदृष्ट्या अव्यवहार्य ठरते. मग अशा भिन्न परिस्थितींमध्ये एकाच प्रकारची मदत देण्याचा अट्टहास कशासाठी? शासनाने परिस्थितीनुसार पर्याय निवडण्याचे लवचीक धोरण स्वीकारले पाहिजे.

**थेट अनुदानाचा पर्याय; पण चारा उपलब्ध असेल तरच!**

ज्या भागांत बाजारात चारा उपलब्ध आहे, मात्र त्याच्या किमती पशुपालकांच्या आवाक्याबाहेर गेल्या आहेत, तेथे पात्र पशुपालकांच्या खात्यावर थेट चारा अनुदान जमा करणे हा प्रभावी पर्याय ठरू शकतो. यामुळे जनावरे दूरच्या चारा छावण्यांमध्ये हलविण्याची गरज कमी होईल. छावण्यांसाठी जागा, पाणी, निवारा, मनुष्यबळ, स्वच्छता, सुरक्षा आणि वाहतूक यांवर होणारा प्रशासकीय खर्चही वाचू शकतो. पशुपालकांना स्वतः च्या गावात राहून जनावरांची देखभाल करता येईल.

मात्र, थेट अनुदान म्हणजे शासनाची जबाबदारी संपली, असा त्याचा अर्थ काढता कामा नये. बाजारात चारा उपलब्धच नसेल, बाहेरून चारा आणण्याची वाहतूक व्यवस्था कोलमडली असेल किंवा चाऱ्याचे दर अनुदानापेक्षा कितीतरी अधिक असतील, तर खात्यात जमा झालेले पैसे जनावरांची भूक भागवू शकणार नाहीत. अशा वेळी आर्थिक मदतीपेक्षा प्रत्यक्ष चारा उपलब्ध करून देणे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच अनुदान देण्यापूर्वी स्थानिक बाजारपेठ, चाऱ्याचे दर आणि पुरवठा व्यवस्था यांची वस्तुनिष्ठ तपासणी आवश्यक आहे.

**चारा डेपो हा मधला मार्ग!**

चाऱ्याची स्थानिक उपलब्धता अपुरी असली, तरी बाहेरून चारा आणणे शक्य असेल, तर चारा डेपो हा व्यवहार्य पर्याय ठरू शकतो. ग्रामपंचायत, सहकारी सेवा संस्था आणि सेवाभावी संघटनांच्या सहकार्याने गाव किंवा गावांच्या समूहासाठी असे डेपो उभारता येतील. शासकीय देखरेखीखाली अनुदानित दराने चारा उपलब्ध करून दिल्यास पशुपालकांना दिलासा मिळेल. चाऱ्याची खरेदी, वाहतूक, साठवणूक आणि वितरण यामध्ये पारदर्शकता राखली, तर गैरव्यवहारालाही आळा घालता येईल.

चारा छावण्यांबाबत यापूर्वी आर्थिक गैरप्रकारांच्या तक्रारी झाल्याने या योजनेची विश्वासार्हता काही प्रमाणात कमी झाली आहे. मात्र, गैरव्यवहार झाले म्हणून संपूर्ण योजना निरुपयोगी ठरविणे चुकीचे आहे. उलट, त्रुटी दूर करून नियंत्रण यंत्रणा अधिक सक्षम करणे आवश्यक आहे. चारा डेपोमध्ये चाऱ्याचा साठा, खरेदीचे दर, वितरण आणि लाभार्थ्यांची माहिती सार्वजनिक केली, तर स्थानिक पातळीवर सामाजिक नियंत्रण ठेवता येईल. सेवाभावी संस्था आणि दानशूर व्यक्तींचा सहभाग घेतल्यास शासनावरील भारही कमी होऊ शकतो.

**तीव्र टंचाईत चारा छावण्याच आधार!**

ज्या भागात चाऱ्याची एक काडीही उपलब्ध नाही, चारा डेपो चालविणे शक्य नाही आणि बाहेरून चारा आणणेही व्यवहार्य ठरत नाही, तेथे चारा छावण्यांना पर्याय नाही. अशा परिस्थितीत केवळ अनुदानाची घोषणा करून शासनाला आपली जबाबदारी झटकता येणार नाही. जनावरांना जगविण्यासाठी प्रत्यक्ष हस्तक्षेप करणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र, छावण्या सुरू करताना पशुधनाची संख्या, उपलब्ध जागा, पाणी, चाऱ्याचा नियमित पुरवठा आणि पशुवैद्यकीय सुविधांचा विचार केला पाहिजे.

मोठ्या छावण्यांमध्ये हजारो जनावरे एकत्र आल्याने संसर्गजन्य रोगांचा धोका वाढू शकतो. स्वच्छता, निवारा, चाऱ्याचे योग्य वितरण आणि वैद्यकीय सेवा यांचे नियोजनही कठीण होते. त्यामुळे आवश्यकतेनुसार गावांच्या समूहासाठी लहान छावण्या सुरू करण्याचा पर्याय तपासता येईल. छावण्यांमध्ये केवळ जनावरे जिवंत ठेवण्यापुरती व्यवस्था न करता त्यांच्या आरोग्याची आणि पोषणाचीही काळजी घेतली पाहिजे.

**डिजिटल नोंदणी आणि पारदर्शकतेची गरज**

थेट अनुदान असो, चारा डेपो असो किंवा छावणी; लाभ खऱ्या पशुपालकांपर्यंत पोहोचणे सर्वांत महत्त्वाचे आहे. प्रत्येक पात्र जनावराची कानातील बिल्ल्याद्वारे ओळख, डिजिटल नोंदणी आणि भारत पशुधन प्रणालीतील उपलब्ध माहितीचा वापर करून मदत प्रत्यक्ष पशुधनाशी जोडता येईल. यामुळे बनावट नोंदी, दुबार लाभ आणि अपात्र लाभार्थ्यांना मदत मिळण्याची शक्यता कमी होईल. त्याचबरोबर मदतीची रक्कम, चाऱ्याचे प्रमाण आणि वितरण यांचे नियमित लेखापरीक्षण आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा वापर करताना मात्र नोंदणीतील त्रुटींमुळे खऱ्या पशुपालकांना मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

दुष्काळात चाऱ्याइतकेच पाणी आणि पशुआरोग्य महत्त्वाचे असते. कुपोषणामुळे जनावरांची रोगप्रतिकारशक्ती कमी होते, उष्णतेचा ताण वाढतो आणि दूध उत्पादनासह प्रजननक्षमतेवरही परिणाम होतो. त्यामुळे चारा डेपो आणि छावण्यांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी, पशुवैद्यकीय तपासणी, आवश्यक उपचार, लसीकरण आणि खनिज मिश्रण उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यासाठी पशुसंवर्धन विभागाबरोबरच कृषी विभागाचा सहभाग वाढविला पाहिजे.

**निर्णय आकडेवारीवर, पशुधनाच्या हितासाठी!**

शासनाने तालुका आणि गावनिहाय चाऱ्याची उपलब्धता, पशुधनाची संख्या, बाजारभाव, पाण्याची स्थिती आणि वाहतूक व्यवस्था यांचा नियमित आढावा घ्यावा. चारा उपलब्ध, पण महाग असेल तेथे थेट अनुदान; चारा कमी, पण पुरवठा शक्य असेल तेथे चारा डेपो; आणि तीव्र टंचाईच्या भागात चारा छावणी, असे परिस्थितीनुसार धोरण राबवावे. दुष्काळाची तीव्रता बदलल्यास मदतीचा प्रकार बदलण्याची लवचीकताही प्रशासनाकडे असली पाहिजे.

दुष्काळात सरकारी खर्च कमी करणे महत्त्वाचे असले, तरी त्या प्रयत्नांतून पशुधनाची उपेक्षा होता कामा नये. आज चाऱ्याअभावी जनावरे गमावलेला शेतकरी उद्या केवळ एका उत्पन्नाच्या साधनाला मुकत नाही, तर त्याच्या आर्थिक पुनर्बांधणीचा आधारही गमावतो. पशुधन पुन्हा उभे करण्यासाठी वर्षानुवर्षे कष्ट आणि मोठे भांडवल लागते. त्यामुळे वेळीच मदत करणे हे खर्चाचे ओझे नसून ग्रामीण अर्थव्यवस्था वाचविण्यासाठी केलेली गुंतवणूक आहे. दुष्काळात शासनाने पर्यायांची चर्चा करण्यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष कृती करावी. कारण शेवटी प्रश्न चारा छावणीचा, डेपोचा किंवा अनुदानाचा नाही; प्रश्न आहे तो शेतकऱ्याच्या जगण्याचा आणि त्याच्या पशुधनाच्या अस्तित्वाचा. पैसा वाचविण्यापेक्षा पशुधन वाचविणे महत्त्वाचे; कारण पशुधन टिकले, तरच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा टिकेल!

---

# नेवासा येथे रावण दहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद, नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले यांच्या हस्ते रावण दहन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** विजयादशमी अर्थात दसऱ्याच्या पावन पर्वानिमित्त नेवासा येथील खुपटी रस्त्यावरील जामदार-गायकवाड यांच्या मळ्यात असलेल्या सीमोल्लंघन स्थळी रावण दहनाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.रावण दहन कार्यक्रम प्रसंगी 'जय श्रीराम'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला होता.

नेवासा शहरातील नागरिकांचे श्र द्धास्थान असलेल्या या सीमोल्लंघन स्थळी शमीचे वृक्ष असून, दसऱ्याच्या दिवशी नागरिक येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने येतात. याच परंपरेला धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सवाची जोड देत खुपटी रस्त्याच्या कडेला मूर्तिकार आकाश गायकवाड यांनी रावण दहनासाठी रावणाचा भव्य पुतळा तयार केला होता.

यावेळी 'सियावर रामचंद्र की जय','जय श्रीराम, जय जय श्रीराम' अशा जयघोषांनी परिसर दुमदूमन गेला. नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील आणि धर्मरक्षक सोन्याभाऊ परदेशी यांच्या हस्ते रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी विजयादशमीचा उत्सव उत्साहात साजरा केला.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील म्हणाले की, शहराच्या विकासकामांसाठी निधी उपलब्ध आहे; मात्र विकासकामांच्या मार्गात अडथळे निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींमुळे कामांमध्ये व्यत्यय येत आहे. अशा अडथळ्यांचे प्रतीक असलेल्या दशाननाचे दहन करून विकासाच्या मार्गातील अडचणी दूर करण्याचा संकल्प आपण केला पाहिजे, असे त्यांनी सांगितले.

रावण दहनाच्या या कार्यक्रमामुळे नेवासा येथील सीमोल्लंघन स्थळी दसऱ्याच्या उत्सवाला विशेष रंगत आली.रावण दहन कार्यक्रम प्रसंगी सेवानिवृत्त शिक्षक सखाराम जामदार गुरुजी,श्रीमंत कान्हूअण्णा दाणे,दसरा उत्सव कमिटीचे रविंद्र शेंडे,अण्णासाहेब जामदार,महेश जामदार, सचिन कडू,नगरसेवक कृष्णाभाऊ परदेशी,दिनेश व्यवहारे,निरंजन डहाळे, जालूभाऊ गवळी,अजित नरुला यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धार्मिक परंपरा, श्रीरामाचा



जयघोष आणि विजया दशमीचा उत्साह अशा भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी झालेल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

---

# विद्यार्थिनींनी करिअरची निवड स्वतःच्या विवेकाने करावी : सुनंदाताई पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** विद्यार्थिनींनी स्वतःच्या क्षमतांची ओळख करून घेत करिअरची निवड स्वतःच्या विवेकाने करावी. मानसिक व शारीरिक आरोग्य जपावे, आत्मविश्वास कायम ठेवावा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग स्वतःच्या प्रगतीसाठी करावा, असे प्रतिपादन ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, बारामतीच्या विश्वस्त-सचिव सुनंदाताई पवार यांनी केले.

रयत शैक्षणिक संकुलातील महिला सक्षमीकरण समिती व विद्यार्थिनी वसतिगृह समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जागर स्त्री सक्षमीकरणाचा' या विशेष व्याख्यानात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलच्या सदस्या तथा संकुलप्रमुख मीनाताई जगधने होत्या.

सुनंदाताई पवार म्हणाल्या, कुटुंब हे संस्कारांचे विद्यापीठ आहे. विद्यार्थिनींनी आई-वडिलांचा आदर राखावा, आईशी मनमोकळा संवाद साधावा आणि मित्रमैत्रिणींची निवड विचारपूर्वक करावी. नियमित व्यायाम, आरोग्याची काळजी आणि उपयुक्त कौशल्यांचे प्रशिक्षण यांना प्राधान्य द्यावे. तंत्रज्ञानाचा वापर ज्ञानवृद्धी व करिअर विकासासाठी करावा.

सावी फाउंडेशन, अकलूजच्या अध्यक्षा सविताताई व्होरा यांनी स्त्रीशिक्षण, स्त्रीसन्मान आणि स्वसंरक्षणाचे महत्त्व स्पष्ट केले. मुलींना जगण्याचा व शिक्षणाचा समान अधिकार मिळाला पाहिजे. सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत मुलींनी आत्मसन्मानाने आणि धैर्याने जीवनातील आव्हानांना सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय मनोगतात मीनाताई जगधने यांनी ग्रामीण भागातील मुलींनीही आवडीचे क्षेत्र निवडून आत्मविश्वासाने प्रगती करावी, असे सांगितले.

प्राचार्य डॉ. प्रवीण बडधे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. संजय कांबळे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. योगिता रांधवणे व प्रा. योगिता बागुल यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अश्विनी म्हेत्रस व प्रा. दीपामाला पाडवे यांनी संयोजन केले. कार्यक्रमास विद्यार्थिनी व प्राध्यापिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

---

# दोन चिमुकल्यांनी केले दहा दिवस नवरात्रीचे उपवास

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**श्रीरामपूर :** येथील अध्यात्म मिलिंद झिरंगे या चिमुकल्याने सातव्या वर्षी नवरात्रोत्सवात दहा दिवसांचा उपवास केला. त्याचा मोठा भाऊ आराध्य मिलिंद झिरंगे (वय १०) यानेही दहा दिवसाचे उपवास केले.

अध्यात्म आणि आराध्य दोघेही रयत शिक्षण संस्थेच्या येथील एस के सोमय्या शाळेत अनुक्रमे इयत्ता दुसरी व इयत्ता सहावीमध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांचे वर्गशिक्षक गांगुर्डे सर व शिक्षिका डांगे आणि धुमाळ मॅडम यांच्यासह शिक्षक, शिक्षिका, सहकारी व नातेवाइकांनी कौतुक करून अभिनंदन केले. श्र द्धा, भक्ती आणि संयमातून जपलेल्या या परंपरेचे परिसरातून कौतुक होत आहे.

---

# सुखदेव फुलारी यांना राज्यस्तरीय निर्भीड पत्रकारिता पुरस्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** कांगोणी फाटा येथील श्री संत किसन महाराज सुडके संस्थानच्या वतीने सन २०२६ चे राज्यस्तरीय साहित्य गौरव आणि पत्रकारिता पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. भेंडा येथील पत्रकार सुखदेव फुलारी यांना राज्यस्तरीय निर्भीड पत्रकारिता पुरस्कार जाहीर झाला आहे. संस्थानचे मठाधिपती गुरुवर्य बाळकृष्ण महाराज सुडके यांनी ही माहिती दिली.

वारकरी संप्रदायातील साहित्यपरंपरा आणि संत ज्ञानेश्वर महाराजांनी नेवासा येथे ज्ञानेश्वरी ग्रंथाची निर्मिती केल्याचे महत्त्व लक्षात घेऊन संस्थानच्या वतीने



हे पुरस्कार दिले जातात. यंदा विविध वाङ्मय प्रकारांतील १६५ पुस्तकांचा पुरस्कारांसाठी विचार करण्यात आला. तज्ज्ञ परीक्षकांनी परीक्षण केल्यानंतर विजयादशमीच्या दिवशी, २० ऑक्टोबर रोजी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली.

कथा संग्रह विभागात सुनील मंगेश जाधव, आबासाहेब घावटे आणि काशिनाथ माटल, आत्मचरित्र व व्यक्तिचरित्र विभागात डॉ. प्रमोद चौधरी, सतीश नाईकवाडे आणि विठ्ठल पांडुरंग पाटील, तर कादंबरी विभागात शेखर खंडेराव फराटे, ऋषिकेश गोल्हार आणि राजेश चौरे यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. प्रवासवर्णन, ललित लेख, नाटक, संत साहित्य, काव्यसंग्रह आणि बालसाहित्य या विभागांतही साहित्यिकांची निवड करण्यात आली आहे.

विशेष पुरस्कारांमध्ये ग्रामीण उद्योग व व्यवसाय पुरस्कार सोपानराव शिकारे, धन्वंतरी पुरस्कार डॉ. महेंद्र शिंदे, शैक्षणिक गुणवत्ता पुरस्कार प्राजक्ता कचरे आणि प्रगतिशील कृषी पुरस्कार महेश रहाटळ यांना जाहीर झाला आहे.

रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० वाजता कांगोणी फाटा येथील श्री संत किसन महाराज सुडके संस्थान येथे संत-महंत आणि मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे.

---

# प्रवरा पट्ट्यातील पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाला दुष्काळाच्या झळा

## श्जनावरांचे बाजार कोसळले; परराज्यांतील मागणी ८० टक्क्यांनी घटली

**रविंद्र बालोटे | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी |** घर चालवायचं की दावणीचं जनावर जगवायचं? असा सवाल प्रवरा पट्टा वगळता बहुतांश गावातील पशुपालकाना पडला आहे. संगमनेर-राहाता परिसरातील विशेषतः आश्वी आणि जोर्वे गटातील हजारो शेतकरी कुटुंबांचे पशुपालन आणि दुग्धव्यवसाय हेच मुख्य उपजीविकेचे साधन आहे. गायींचे संगोपन, दूधविक्री आणि जनावरांच्या खरेदी-विक्रीतून मिळणाऱ्या नफ्यावर या भागातील ग्रामीण संसाराचा गाडा चालतो.

मात्र, यंदा 'एल निनो'च्या प्रभावामुळे पावसाने पूर्णतः पाठ फिरवल्याने संपूर्ण महाराष्ट्रावर दुष्काळाचे भीषण सावट पसरले आहे. याचा थेट आणि सर्वाधिक फटका शेतीचा कणा मानल्या जाणाऱ्या पशुपालन आणि दुग्धव्यवसायाला बसला असून, चारा-पाण्याचा तीव्र तुटवडा, गगनाला भिडलेले खाद्याचे दर आणि दुसरीकडे जनावरांच्या खरेदी-विक्रीचे कोसळलेले भाव अशा दुहेरी कात्रीत शेतकरी आणि पशुपालक पुरते अडकल्याची स्थिती निर्माण झाली आहेत.

उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठा 'लोणी येथील जनावरांचा आठवडे बाजार' सध्या दुष्काळाच्या तीव्र झळांनी होरपळून निघत आहे. दर बुधवारी भरणाऱ्या या बाजारात सुमारे ३ हजारांहून अधिक



उत्तम दुधाळ गाई विक्रीसाठी दाखल होत असल्या, तरी प्रत्यक्षात होणारी खरेदी मात्र निम्म्याहून कमी झाली आहे. बाजारात जनावरांची आवक प्रचंड प्रमाणात असली, तरी स्थानिक आणि बाहेरील खरेदीदार अचानक गायब झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात १ हजाराहून अधिक व्यापारी बाजारात उपस्थित राहून जनावरांची घाऊक खरेदी करत होते; परंतु यंदा ही संख्या सहाशे ते साडेसाहाशे व्यापाऱ्यांवर आल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. खरेदीदारांच्या या कमतरतेमुळे बाजारातील आर्थिक उलाढालीला प्रचंड मोठा हादरा बसला असून, गेल्या वर्षी दर बुधवारी होणारी ११ ते १२ कोटींची उलाढाल यंदा थेट ७ ते साडेसात कोटी रुपयांवर घसरली आहे. म्हणजेच एकाच दिवसाच्या बाजारात तब्बल ४ कोटी किंवा कमी अधिक रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे.

प्रवरा पट्ट्यातील, विशेषतः आश्वी आणि जोर्वे परिसरातील उच्च प्रतीच्या आणि संकरित जनावरांना आंध्र प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, तामिळनाडू आणि गुजरात या राज्यांतून नेहमीच मोठी मागणी असायची. मात्र, यंदा या शेजारील राज्यांमध्येही कमी-अधिक प्रमाणात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने परराज्यांतील बड्या व्यापाऱ्यांनी महाराष्ट्रातील बाजारांकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे. दर बुधवारी २०० पेक्षा अधिक गायी लोणीच्या बाजारातून परराज्यांत विक्री होत होत्या. परंतु, या मागणीत तब्बल ८० टक्क्यांची प्रचंड घट नोंदवली गेली आहे. स्वतःच्या दावणीला चारा नसल्याने हवालदिल झालेले पशुपालक विक्रीसाठी गायी घेऊन बाजारात येत आहेत; परंतु ग्राहकच नसल्यामुळे अखेर त्यांना या दुधाळ गाई अक्षरशः पडत्या आणि कवडीमोल दरात विकण्याची वेळ आली आहे.

गतवर्षीच्या तुलनेत चालू हंगामात जनावरांच्या भावात झालेली घसरण पशुपालकांचे कंबरडे मोडणारी ठरली आहे. मागील वर्षी ऑक्टोबर महिन्यात लोणी बाजारात होल्स्टीन जातीची उत्तम दुधाळ गाय सुमारे दीड लाख रुपयांपर्यंत सहज विकली जात होती; मात्र यंदा त्याच दर्जाच्या गायीची किंमत थेट ८० हजार ते १ लाखाच्या घरात आली आहे. म्हणजेच शेतकऱ्यांना एका गायीमागे ५० ते ७० हजार रुपयांचा थेट तोटा सहन करावा लागत आहे. स्थानिक व्यापारी आणि शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अपेक्षित दरापेक्षा ३० ते ३५ टक्क्यांहून कमी दरात नाईलाजाने सौदे पूर्ण करावे लागत आहेत.

दुधाचे खरेदी दर कागदावर वाढलेले दिसत असले, तरी प्रत्यक्ष उत्पादन खर्च आणि नफ्याची सांगड घालणे आता पशुपालक शेतकऱ्यांसाठी अशक्य बनले आहे.

---

# प्रा. वसंत पुंड यांना मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**सोनई :** मुळा एज्युकेशन सोसायटीच्या माका येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. वसंत लक्ष्मण पुंड यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून मराठी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. प्रा. पुंड यांनी 'दिनेश काळे यांच्या साहित्यातील महानगरीय जीवनजाणिवा' या विषयावर संशोधन केले. गांधी महाविद्यालय, कडा येथील मराठी विभागप्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक प्रा. डॉ. अनिल गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधनकार्य पूर्ण केले. या संशोधनात दिनेश काळे यांच्या कथा, कादंबऱ्या आणि नाटकांमधून व्यक्त झालेल्या महानगरीय जीवनाचे चित्रण करण्यात आले आहे. महानगरीय जीवनातील विविध सामाजिक आणि मानवी संवेदनांचा वेध घेणारे हे संशोधन साहित्याच्या अभ्यासकांसाठी उपयुक्त ठरणार आहे. प्रा. पुंड यांच्या या यशाबद्दल मुळा एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष यशवंतराव गडाख, माजी मंत्री शंकरराव गडाख, सुनीताताई गडाख, संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख, सचिव उत्तमराव लोंढे, सहसचिव डॉ. विनायक देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. निवृत्ती मिसाळ, प्राचार्य डॉ. भानुदास चोपडे, डॉ. रविंद्र खंदारे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# ‘अशोक’ कारखाना तालुक्याची आर्थिक जीवनवाहिनी

## शेतकऱ्यांनी ऊस देऊन सहकार्य करावे । महंत रामगिरीजी महाराज यांचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अशोकनगर** : अशोक सहकारी साखर कारखाना गेल्या ६९ वर्षांपासून शेतकऱ्यांची सेवा करीत असून, तालुक्याच्या आर्थिक विकासात त्याचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. कारखाना हा शेतकरी, कामगार आणि परिसरातील अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा आधार असल्याने शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्याला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन श्री क्षेत्र गोदावरी धाम, सरला बेटचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांनी केले.



अशोक सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२६-२७ मधील ७० व्या ऊस गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन व गळीत हंगाम शुभारंभ महंत रामगिरीजी महाराज यांच्या हस्ते, तर कारखान्याचे चेअरमन व माजी आमदार भानुदास मुरकुटे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. यावेळी बोलताना महंत रामगिरीजी महाराज म्हणाले, साखर उद्योगासमोर ऊस उपलब्धता, उत्पादन खर्च आणि बाजारातील चढ-उतार अशी अनेक आव्हाने आहेत.

मात्र, मुरकुटे यांनी संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, सभासद आणि ऊस उत्पादकांच्या सहकार्याने कारखान्याची वाटचाल सुरू ठेवली आहे. इतर कारखान्यांच्या बरोबरीने ऊस उत्पादकांना योग्य दर देण्याची भूमिका अशोक कारखान्याने कायम ठेवली आहे. कारखान्याची गाळप क्षमता वाढून अधिकाधिक ऊस गाळप झाल्यास शेतकऱ्यांनाही त्याचा लाभ होईल. त्यामुळे शेतकऱ्यांनी ऊस लागवडीचे नियोजन करून कारखान्याला सहकार्य करावे, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात भानुदास मुरकुटे म्हणाले, यंदा पुरेशा पावसाअभावी ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगासमोर आव्हाने आहेत. उपलब्ध संसाधनांचे योग्य नियोजन करून गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. साखरेच्या बाजारभावाचा विचार करून शेतकऱ्यांना त्यांच्या उसाला जास्तीत जास्त दर देण्याचा प्रयत्न केला जाईल. कारखाना आणि शेतकरी यांचे नाते परस्परपूरक असून, शेतकऱ्यांनी आपला ऊस अशोक कारखान्याला द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

प्रारंभी यशवंत रणनवरे व अर्चनाताई रणनवरे तसेच विकास शिवरकर व माधुरीताई शिवरकर यांच्या हस्ते बॉयलर पूजन करण्यात आले. बाबासाहेब आदिक व आशाताई आदिक तसेच प्रदीप शिंदे व जयश्रीताई शिंदे यांच्या हस्ते गव्हाण पूजन झाले. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष आदिनाथ झुराळे, माजी चेअरमन सुरेश गलांडे, विविध संचालक, अधिकारी, कर्मचारी, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी आणि ऊसतोडणी व वाहतूक ठेकेदार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मंगेश उंडे यांनी केले, तर संचालक विरेश गलांडे यांनी आभार मानले.

## द • ख • ल

### बोरावके महाविद्यालयात जयंती साजरी



**श्रीरामपूर** : रावबहादूर नारायणराव बोरावके यांची १३५ वी जयंती बोरावके महाविद्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी जनजागृती संघाचे मनोजकुमार नवले पाटील यांनी प्रतिमापूजन करून अभिवादन केले. नारायणराव बोरावके यांनी श्रीरामपूरमध्ये शैक्षणिक क्रांती घडवून आणत अनेक विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मार्ग खुला केला. तसेच शिक्षण, कृषी आणि व्यवसाय क्षेत्रांतून अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या, असे मनोजकुमार नवले यांनी सांगितले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण बडदे, अनुप दळवी, उपप्राचार्य प्रताप काळे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### विशेष योगदानाबद्दल बालाजी देवस्थानकडून सन्मान



**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथील चंद्रभान कदम व त्यांचे सुपुत्र आदिनाथ कदम व रवींद्र कदम यांनी पुणे येथे सुरू असलेल्या त्यांच्या आद्य क्रिएशनमार्फत बालाजी देडगाव येथील बालाजी मंदिरासाठी मागील चार वर्षात दिलेल्या विशेष योगदानाबद्दल बालाजी देवस्थानच्या वतीने संपूर्ण कदम परिवाराचा सन्मान करण्यात आला. कदम परिवाराच्यावतीने पहिल्या वर्षी लाईट बोर्ड, दुसऱ्या वर्षी फ्लावर डेकोरेशन, तिसऱ्या वर्षी मंडप डेकोरेशन, चौथ्या वर्षी संपूर्ण मंदिर परिसराला सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा सेटअप दिला आहे. त्यांच्या या योगदानाबद्दल कदम परिवाराचा बालाजी देवस्थानच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी माजी चेअरमन बाबासाहेब मुंगसे, माजी सरपंच दत्ता पाटील मुंगसे, ज्ञानदेव कदम सर, ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके, संभाजीराजे काजळे, नारायण मुंगसे आदी उपस्थित होते.

### बालचित्रकला स्पर्धेत जयवर्धनची जिल्हास्तरीय निवड



**प्रवरानगर** : महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने आयोजित बालचित्रकला स्पर्धा २०२६ मध्ये लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरानगर येथील प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कूल येथील इयत्ता सातवीचा विद्यार्थी जयवर्धन गणेश माने देशमुख याने आपल्या कलागुणांच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत त्याची जिल्हास्तरीय बक्षिसासाठी निवड झाली. चित्रकलेच्या माध्यमातून कल्पनाशक्ती, सर्जनशीलता आणि कलात्मक अभिव्यक्तीला वाव देणाऱ्या या स्पर्धेत जयवर्धनने आपल्या प्रतिभेची छाप उमटवली. त्याच्या या यशामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रात प्रगती करण्यासाठी नवी प्रेरणा मिळाली आहे. जयवर्धनला शाळेच्या प्राचार्या शैलेजा घोरपडे, कला शिक्षक सतीश जाधव आणि भारती थाटे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अतिरिक्त संचालक डॉ. शिवानंद हिरेमठ, शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, शिक्षण संचालिका सौ. लीलावती सरोदे आणि डॉ. महेश खर्डे,प्रा.विजय आहेर आदींनी जयवर्धनचे अभिनंदन केले.

## कारवाई होईपर्यंत देवकर यांचे उपोषण सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : श्रीरामपूर नगरपालिकेतील कथित आर्थिक अनियमितता आणि विविध विकासकामांमधील गैरव्यवहारांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, या मागणीसाठी राजेंद्र पा. देवकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २१ ऑक्टोबरपासून पुन्हा उपोषण सुरू केले आहे. मागण्यांवर कारवाई होईपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

नगरपालिकेचे तत्कालीन मुख्याधिकारी सोमनाथ जाधव आणि तत्कालीन लेखापाल महेश कवटे यांना सेवेतून बडतर्फ करून त्यांच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी देवकर यांनी केली आहे.

बायोमायनिंग प्रक्रिया न करता अडीच कोटी रुपयांचे बिल अदा केल्याचा आरोप करत या प्रकरणाची चौकशी करून संबंधित अधिकारी आणि ठेकेदारावर गुन्हे दाखल करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. याशिवाय चौकशी समितीवर कारवाई करावी, तसेच श्रीरामपूर येथील जिल्हा परिषद धर्मशाळेच्या जागेवरील बांधा-वापरा-हस्तांतरित करा तत्त्वावरील कामाची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, असे निवेदनात म्हटले आहे.

## सहाय्यक कल्याण आयुक्त भावना बच्छाव यांची ज्ञानेश्वर कारखान्याला सदिच्छा भेट

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**नेवासा** : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, नाशिक विभागाच्या सहाय्यक कल्याण आयुक्त भावना बच्छाव यांनी लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळाला सदिच्छा भेट दिली. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष मा. आ. डॉ. नरेंद्रजी घुले पाटील यांच्या हस्ते भावना बच्छाव यांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रविंद्र मोटे कामगार कल्याण अधिकारी बाळासाहेब डोहाळे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे निलेश वाघ, अनिल बोरसे तसेच ह.भ.प. कृष्णा महाराज उगले आदी मान्यवर उपस्थित होते.या सदिच्छा भेटीप्रसंगी कारखाना प्रशासनातील अधिकारी व उपस्थित मान्यवरांनी भावना बच्छाव यांचे स्वागत केले.

## माहिती अधिकाराचे उल्लंघन । महिला व बालविकास आयुक्तालयाला आयोगाची समज

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : माहिती अधिकाराच्या द्वितीय अपिलाची सुनावणी होऊनही चार महिने निकालाच्या प्रतीक्षेत राहिलेल्या अर्जदाराला अखेर राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाने दिलासा दिला. अर्जदाराने वारंवार तक्रारी केल्यानंतर अवघ्या ५० मिनिटांत लेखी आदेश जारी करण्यात आला. महिला व बालविकास आयुक्तालयातील जनमाहिती अधिकाऱ्याने माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याचे नमूद करत आयोगाने समज दिली असून, भविष्यात नियमांचे पालन न केल्यास शिस्तभंग कारवाईचा इशाराही दिला आहे.

माहिती अधिकार कार्यकर्ते आणि साऊ एकल महिला समितीचे राज्य समन्वयक मिलिंदकुमार साळवे (श्रीरामपूर) यांनी ३१ डिसेंबर २०२४ रोजी महिला व बालविकास आयुक्तालयाकडे अर्ज करून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना आणि केंद्राच्या मिशन वात्सल्य योजनेतील लाभार्थी व अनुदानवाटपाची जिल्हानिहाय माहिती मागितली होती. मात्र, जनमाहिती अधिकारी योगेश जवादे यांनी अर्ज राज्यातील ३६ जिल्हा महिला व बालविकास अधिकाऱ्यांकडे हस्तांतरित केला. त्यानंतर प्रथम अपील करूनही अपेक्षित माहिती मिळाली नाही. त्यामुळे साळवे यांनी राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठात द्वितीय अपील दाखल केले. २६ मे २०२६ रोजी सुनावणी झाल्यानंतरही चार महिने आदेश मिळाला नाही. वारंवार तक्रारी करूनही दखल न घेतल्याने त्यांनी पुन्हा ईमेलद्वारे आणि विभागीय माहिती आयुक्तांच्या वैयक्तिक संपर्क क्रमांकावर तक्रार केली. त्यानंतर आयोगाने तातडीने निकाल दिला.

### शिस्तभंग कारवाईचा इशारा

प्रथम अपील आदेशाची अंमलबजावणी न करणे ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन करणारी कृती असल्याचे माहिती आयुक्त मकरंद रानडे यांनी नमूद केले. भविष्यात नियमांचे पालन न केल्यास शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्याचा इशारा देत, उपायुक्तांना माहिती अधिकारी घोषित करून साळवे यांना १५ दिवसांत विनामूल्य माहिती देण्याचे आदेश दिले.

## पिंपरी लोकाईच्या लेकींची इस्त्रो भरारी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**प्रवरानगर** : प्रतिनिधी : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता, जिद्द आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची कमतरता नसते, याचा प्रत्यय जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरी लोकाई येथील दोन विद्यार्थिनींनी दिला आहे. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोच्या सहलीसाठी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणीत इयत्ता सहावीतील तेजल आबासाहेब पारखे आणि इयत्ता आठवीतील कल्याणी ताराचंद गडगे या दोघींची निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे पिंपरी लोकाईच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, दोन्ही विद्यार्थिनींवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विज्ञान, अंतराळ संशोधन आणि आधुनिक तंत्रज्ञानाविषयी विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल निर्माण व्हावे, तसेच देशाच्या अंतराळ संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची प्रत्यक्ष माहिती मिळावी, या उद्देशाने इस्रो सहलीचे आयोजन करण्यात येते. या सहलीसाठी झालेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणीत यश मिळवून तेजल आणि कल्याणी यांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. ग्रामीण भागातील शाळेत शिक्षण घेत असतानाही त्यांनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या यशामागे विद्यार्थिनींची मेहनत, अभ्यासातील सातत्य आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. शिक्षक डॉ. संजय राठोड, गव्हाणे, पोपट काळे, थेटे आणि श्रीमती पाटील यांनी त्यांना मार्गदर्शन केले. तसेच इंग्रजी विषयासाठी सचिन पलघडमल यांनी विशेष मार्गदर्शन केले. दोन्ही विद्यार्थिनींच्या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी अभयकुमार वाव्हळसाहेब, शिक्षण विस्तार अधिकारी गिरी, केंद्रप्रमुख विठ्ठल रंधे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दीपक वराडे, उपाध्यक्ष स्वाती गाडेकर, समितीचे सर्व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक पटेल, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## बांधाच्या वादातून महिलेला मारहाण, पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील चेडगाव येथे बांधावरील लाकडे व दगड गायींच्या अंगावर टाकण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका महिलेला मारहाण करून शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना २१ ऑक्टोबर रोजी सकाळी घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनिषा देविदास शिंदे, (वय ३० वर्षे, रा. चेडगाव, ता. राहुरी), यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी मनिषा शिंदे यांच्या घरासमोर बांधावरील लाकडे व दगड गायींच्या अंगावर टाकण्यावरून त्यांनी पुतण्या महेंद्र संपत शिंदे याला जाब विचारला. याचा राग आल्याने आरोपीने त्यांना शिवीगाळ व दमदाटी करून बांबूच्या काठीने मारहाण केली. तसेच इतर आरोपींनी शिवीगाळ, दमदाटी व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. घडलेल्या घटनेनंतर मनिषा देविदास शिंदे यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी महेंद्र संपत शिंदे, गणेश संपत शिंदे, शोभा संपत शिंदे, सविता महेंद्र शिंदे आणि चैताली गणेश शिंदे या पाच जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून या घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख हे करत आहेत.

## गावच्या सीमेवर जाऊन पारंपरिक पद्धतीने सीमोल्लंघन, शमीपूजन,परंपरा आजही कायम...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील खडांबे खुर्द येथील ग्रामस्थांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर खडांबे गावच्या सीमेवर जाऊन पारंपरिक पद्धतीने सिमोल्लंघन केले. अश्विन शुद्ध दशमी हा दिवस विजयादशमी म्हणून साजरा केला जातो. दसरा हा भारतीय परंपरेनुसार साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त आहे.



या दिवशी सीमोल्लंघन,शमीपूजन,अपराजिता पूजन आणि शस्त्र पूजन केले जाते. खडांबे खुर्द येथील माजी सरपंच स्वर्गवासी काशिनाथ हरिश्चंद्रे यांच्या घराण्याला हा गावातील प्रमुख मानापैकीं असलेला हा मान आहे. हरिश्चंद्रे कुटुंबासह गावातील अनेक ग्रामस्थांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर गावाच्या सीमेवर जाऊन शमीपूजन व सीमोल्लंघन करून सोने लुटण्याचा आनंद घेत, आपट्याची पाने लहानांनी आपल्या पेक्षा वयाने मोठ्या असणाऱ्यांना देत आलिंगन देऊन नतमस्तक होऊन एकमेकांना शुभेच्या दिल्या.

आणि पारंपरिक पद्धतीने प्रतिकात्मक शस्त्र आणि आपले शेतीकामाचे साहित्याचे पूजन करण्यात आले. खडांबे खुर्द येथील हरिश्चंद्रे कुटुंबीय आणि ग्रामस्थ सोने लुटण्याची परंपरा आजही मोठ्या भक्तिभावाने जपत आहेत. यावेळी नानासाहेब हरिश्चंद्रे, प्रकाश हरिश्चंद्रे, सुभाष हरिश्चंद्रे, बाबासाहेब हरिश्चंद्रे, लक्ष्मण हरिश्चंद्रे,पत्रकार दिपक हरिश्चंद्रे,नामदेव हरिश्चंद्रे,वैभव हरिश्चंद्रे,अमोल हरिश्चंद्रे, किरण हरिश्चंद्रे, विठ्ठल हरिश्चंद्रे,हरिओम हरिश्चंद्रे, रामेश्वर हरिश्चंद्रे आदींनी एकमेकांना आपट्याची पाने देऊन विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या.

## दुष्काळाशी दोन हात करण्यासाठी झाडे लावा, पाणी वाचवा : आ. विवेक कोल्हे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : दुष्काळाच्या संकटावर मात करण्यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करून पाण्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. पुढील पिढीला निसर्ग आणि पाण्याचे महत्त्व समजावे, तसेच नैसर्गिक साधनसंपत्तीचा जपून वापर करण्याची सवय लागावी, या उद्देशाने संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत असल्याचे प्रतिपादन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आमदार विवेकभैय्या कोल्हे यांनी केले. कोपरगाव शहरातील तहसील मैदानावर संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने विजयादशमीनिमित्त आयोजित ‘दुष्काळासुर दहन व जलसंवर्धन संकल्प’ उपक्रम उत्साहात पार पडला.

आमदार विवेकभैय्या कोल्हे, संजीवनी स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेणुकाताई कोल्हे, नगराध्यक्ष पराग संधान आणि मोनिकाताई संधान यांच्या प्रमुख उपस्थितीत दुष्काळासुराचे प्रतीकात्मक दहन करण्यात आले. यावेळी नगरसेवक, प्रतिष्ठानचे युवा सेवक, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार कोल्हे म्हणाले, संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी महिषासुर दहनाचा उपक्रम राबविला जातो. यंदा या उपक्रमाचे सहावे वर्ष असून, महाराष्ट्रासह कोपरगाव तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन महिषासुराचे प्रतीकात्मक रूपांतर ‘दुष्काळासुरात’ करण्यात आले. पाणी वाचवा, पाणी टिकवा, पावसाचे पाणी साठवा आणि वृक्षारोपण करा, असे संदेश या माध्यमातून देण्यात आले. शहरातील ज्या नागरिकांकडून पावसाचे पाणी साठविण्याची व्यवस्था केली जाईल, त्यांना पाणीपट्टीमध्ये पाच टक्के करसवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून अधिकाधिक लोकांनी जलसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

पुढील नऊ महिने उपलब्ध पाणीसाठ्याचा जपून वापर करणे आवश्यक आहे. पावसाचे आगमन लांबणीवर पडण्याची शक्यता लक्षात घेता पाण्याचे योग्य नियोजन करावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि जलसंधारणाच्या उपाययोजनांमध्ये सहभागी व्हावे, असेही कोल्हे यांनी सांगितले. या उपक्रमात संजीवनी इंग्लिश मीडियम स्कूल आणि एम. के. आढाव स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रभू श्रीराम, सीतामाता आणि हनुमान यांच्या वेशभूषांनी उपस्थितांचे लक्ष वेधले. दुष्काळावर मात करण्यासाठी वृक्षारोपण, पाणी बचत आणि पर्यावरण रक्षणाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.





## एकादशीनिमित्त माऊली मंदिराला एलईडी टीव्ही अर्पण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून येथील माऊली भक्त गणेश पठाडे यांनी माऊली सेवा म्हणून ५५ इंची ओनिडा कंपनीचा एलईडी टीव्ही नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये माऊलींच्या चरणी अर्पण केला. त्यांच्या या भक्तिपूर्ण सेवाभावाबद्दल संस्थानच्या वतीने आभार व्यक्त करून त्यांचा सन्मान करण्यात आला.

माऊलींच्या चरणी श्रद्धेने अर्पण केलेल्या या भेटीमुळे मंदिराच्या सेवाकार्यात मोलाची भर पडली आहे. धार्मिक कार्याप्रती असलेली आस्था आणि सेवाभाव जपणाऱ्या गणेश पठाडे यांच्या या योगदानाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

यावेळी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री, अध्यक्षचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, मुळा कारखान्याचे चेअरमन भाऊसाहेब मोटे,माजी अध्यक्ष नानासाहेब तुवर पंचायत समितीचे माजी सभापती कारभारी जावळे, सेवेकरी योगेश रासने, प्रशांत कानडे, विनोद नळकांडे, राजेंद्र रासने, जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे, राम चव्हाण, सचिन देशपांडे, रुपेश उपाध्ये, अमित मापारी यांच्यासह माऊली भक्त उपस्थित होते.

या निमित्ताने पार पडलेल्या या सेवाकार्यामुळे भक्तिमय वातावरणात कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यात आली.


### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/३०१/२०२६
नेवासा दिनांक १५/१०/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- रविंद्र संजय मुरकुटे रा. देवगांव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. अर्जुन रविंद्र मुरकुटे रा. देवगाव ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव-अर्जुन रविंद्र मुरकुटे, गावाचे नाव-देवगांव, जन्म दिनांक-०३/०१/२०२५

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### ग्रामपंचायत गांजीभोयरे ब-१ निविदा नोटीस

निविदा-/

सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. गांजीभोयरे ता पारनेर जि अहील्यानगर यांच्या कडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहील्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून सीलबंद ब१ दोन लिफाफा पद्धतीने ब-१ निविदा मागविण्यात येत आहे.

| अं.न. | कामाचे नाव | योजना | निविदा विक्री | बयाणा रक्कम | निविदा रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे गांजीभोयरे येथे विठ्ठल मंदिर ते पीर मंदिर रोड कॉक्रीट रोड बनवणे. | १५ वित्त आयोग | ५९०/- | - | ४०७९४२/- | ६ महिने | सु.बे |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबत ची माहिती ग्रामपंचायत गांजीभोयरे.. कार्यालयात दि. २३/१०/२०२६ ते दि.२९/१०/२०२६ या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचा दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा दि. २९/१०/२०२६ रोजी ५.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटि शर्ती बाबत माहिती ग्रा प गांजीभोयरे... येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याच्या अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत गांजीभोयरे... यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया दि. ३०/१०/२०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत गांजीभोयरे... ता पारनेर, जि-अ.नगर येथे पार पडेल निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जिएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब१ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅप पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु.बे. साठी सुरुवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सूट राहील नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅप पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबे साठी प्रमाणपत्रावर सूट चा उल्लेख असणे गरजेचे आहे) व निविदा फि भरलेची पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रा.पं. गांजीभोयरे.., ता. पारनेर, जि.अ.नगर.**

## पान १ वरुन

### जरांगेंच्या ध्वनिफितीने महायुतीत खळबळ!

नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या आरोपांमुळे भाजप आणि शिंदेसेनेतील नेत्यांच्या भूमिकांमध्ये विरोधाभास दिसून येत आहे. मात्र, ध्वनिफितीची अधिकृत सत्यता अद्याप स्पष्ट झालेली नसल्याने तिच्यातील संभाषण आणि त्यातील दाव्यांची निष्पक्ष चौकशी झाल्यानंतरच या प्रकरणाचे वास्तव समोर येणार आहे.

### ज्ञानेश कुमारांविरोधातील ठरावावर नियमानुसारच निर्णय!

मंजूर करून घेण्यासाठी केंद्र सरकार विशेष संसदीय अधिवेशन बोलावण्याच्या विचारात असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, या चर्चेवर बिर्ला यांनी कोणतेही ठोस भाष्य केले नाही. संसदेचे पावसाळी अधिवेशन अधिकृतपणे संपुष्टात आणण्याची प्रक्रिया राष्ट्रपती आणि केंद्र सरकारच्या घटनात्मक अधिकारांशी संबंधित असल्याचे सांगत त्यांनी या विषयापासून अंतर राखले.

विशेष अधिवेशनाबाबत केंद्र सरकारकडून अधिकृत घोषणा झालेली नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दोन्ही सभागृहांत आवश्यक दोनतृतीयांश बहुमताची खात्री झाल्याशिवाय सरकार घटनादुरुस्तीचे पाऊल उचलण्याची शयता कमी असल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे. त्यामुळे विशेष अधिवेशनाची चर्चा असली, तरी त्यासंदर्भातील प्रत्यक्ष संसदीय प्रक्रिया अद्याप स्पष्ट झालेली नाही.

दिल्ली उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्याविरोधातील संसदीय चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून, त्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल, अशी माहिती बिर्ला यांनी दिली. या प्रकरणातील पुढील संसदीय कार्यवाहीकडेही लक्ष लागले आहे. तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडून 'नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया'मध्ये सहभागी झालेल्या २० खासदारांच्या प्रकरणावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात तसेच लोकसभाध्यक्षांसमोरही प्रलंबित असल्याचे बिर्ला यांनी सांगितले. संबंधित खासदारांना उत्तर देण्यासाठी मुदत देण्यात आली असून, दोन्ही बाजूंची उत्तरे प्राप्त झाल्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

एकीकडे मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील संभाव्य ठराव आणि दुसरीकडे मतदारसंघ फेररचनेसाठी विशेष अधिवेशनाची चर्चा, अशा दुहेरी राजकीय पार्श्वभूमीवर लोकसभाध्यक्षांनी संसदीय नियमांनाच प्राधान्य दिले आहे. मात्र, विरोधकांच्या प्रस्तावावर प्रत्यक्ष काय निर्णय होतो आणि विशेष अधिवेशनाबाबत केंद्र सरकार कोणती भूमिका घेते, यावर आगामी राजकीय घडामोडींची दिशा अवलंबून राहणार आहे.

### महाराष्ट्रात वर्षभरात ४० जैविक वायू प्रकल्प!

महाराष्ट्रात नैसर्गिक वायूची मागणी प्रतिदिन सुमारे ५० दशलक्ष घनमीटर असताना पुरवठा केवळ नऊ दशलक्ष घनमीटर आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी कृषी अवशेष आणि सेंद्रिय कचऱ्याचा वापर करण्याची मोठी संधी आहे.

प्रत्येक जिल्ह्यातील लहान शहरांमधील सेंद्रिय कचरा आणि ग्रामीण भागातील कृषी अवशेष एकत्रित करून सामायिक प्रकल्पांपर्यंत पोहोचविण्याचे नियोजन आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत प्रस्ताव मागविण्यात येणार असून, शेतकरी उत्पादक संस्था आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांशी दीर्घकालीन करार केले जाणार आहेत.

### सिस-पे घोटाळा : तलाठ्याला अटक; ११५ कोटींच्या मालमत्ता जप्तीला मंजुरी!

संकटात सापडले.

नितीन अंबादास गांगर्डे यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. त्यानंतर तपास आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे वर्ग करण्यात आला. या प्रकरणात विविध संचालक आणि एजंटवर कारवाई करण्यात आली असून, श्रीगोंदा तालुयातील ९८ जणांना आरोपी करण्यात आल्याची माहिती आहे.

मालमत्ता जप्तीची प्रक्रिया पूर्ण होणे, त्यांचे मूल्य निश्चित करणे आणि कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतरच गुंतवणूकदारांना प्रत्यक्ष किती रक्कम परत मिळू शकेल, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे आरोपींवरील कारवाईबरोबरच गुंतवणूकदारांची रक्कम वसूल करण्याचे मोठे आव्हान तपास यंत्रणेसमोर आहे.

### विखे-पाटील-थोरातांच्या सहमतीचे राजकारण; जिल्हा बँकेत ११ जागा बिनविरोध

गटांमध्ये स्थानिक पातळीवर जुळलेली समीकरणे या निवडीच्या निमित्ताने चर्चेत आली आहेत. जामखेडच्या राजकारणात दोन्ही नेत्यांचे स्वतंत्र प्रभावक्षेत्र असल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील ही बिनविरोध निवड महत्त्वाची मानली जात आहे.

बिनविरोध निवड झालेले उमेदवार जिल्हा बँकेच्या निवडणुकीत ११ जागांवर बिनविरोध निवड झाल्याने उर्वरित जागांसाठीच्या लढतीकडे लक्ष लागले आहे. सहकार क्षेत्रातील नेतृत्वाने समन्वयातून मार्ग काढल्यामुळे निवडणुकीतील स्पर्धा काही प्रमाणात कमी झाली आहे. उर्वरित जागांवरील निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संचालक मंडळाचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. दरम्यान, बिनविरोध निवडींमुळे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात सहमतीच्या राजकारणाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

### साखर कामगार बेमुदत संपावर

बंद कारखाने सुरू करण्याची मागणी राज्यातील बंद आणि आर्थिक अडचणीत असलेले सुमारे ५० साखर कारखाने पुन्हा सुरू करून तेथील कामगारांचे पुनर्वसन करावे, अशी मागणीही संघटनांनी केली आहे. कारखाने बंद पडल्याने रोजगाराचे साधन हिरावलेल्या कामगारांना पुन्हा काम मिळावे, तसेच त्यांच्या सेवेशी संबंधित प्रश्न सोडवावेत, अशी भूमिका कामगारांनी घेतली आहे. याशिवाय रोजंदारी आणि कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना कारखान्यांच्या सेवेत सामावून घेऊन योग्य वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगारांच्या सेवाशर्ती आणि वेतनातील प्रश्नांवर तोडगा काढण्याची अपेक्षा संघटनांनी व्यक्त केली आहे.

# पाण्याचा अपव्यय केल्यास पाच हजारांचा दंड

## वैजापूर नगर परिषदेची कठोर भूमिका



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** अल निनोच्या प्रभावामुळे संभाव्य पाणीटंचाईचे संकट गडद होण्याची शक्यता असताना वैजापूर नगरपरिषदेने पाणी बचतीसाठी कठोर भूमिका घेतली आहे. पिण्याच्या पाण्याचा गैरवापर किंवा अपव्यय करताना आढळल्यास संबंधित नागरिकांवर पाच हजार रुपयांचा दंड आकारण्यात येणार आहे. गाड्या धुणे, अंगणात पिण्याच्या पाण्याचा सडा मारणे यांसारख्या प्रकारांवर नगरपरिषदेची नजर राहणार आहे. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर ङ रे परिपत्रकानुसार अल निनोच्या पार्श्वभूमीवर शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे. या परिस्थितीत शहरातील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याने नगरपरिषदेने नागरिकांना पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे.अल निनोचा प्रभाव पुढील वर्षअखेरपर्यंत राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढू नये, यासाठी नागरिकांनी पिण्याच्या पाण्याचा वापर केवळ आवश्यक कामांसाठीच करावा, असे आवाहन मुख्याधिकाऱ्यांनी केले आहे.दरम्यान, पाणी वितरण व्यवस्थेतील गळती शोधून ती तातडीने थांबविण्यासाठी नगरपरिषदेने विशेष मोहीम हाती घेतली आहे. प्रशासनाकडून पाणी बचतीचे प्रयत्न सुरू असताना नागरिकांनीही सहकार्य करणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ अन्वये पिण्याच्या पाण्याचा गैरवापर करणाऱ्यांकडून पाच हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा अपव्यय टाळून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन वैजापूर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी भागवत बिघोत यांनी केले आहे.

## अश्विन फार्मसी महाविद्यालयाचा अनुपम आयुर्वेदिक फार्मसीसोबत सामंजस्य करार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी :** मांची हिल येथील अश्विन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाने छत्रपती संभाजीनगर येथील शेंद्रा औद्योगिक वसाहतीतील 'अनुपम आयुर्वेदिक फार्मसी' या कंपनीसोबत सामंजस्य करार केला आहे. महाविद्यालयातील तृतीय व अंतिम वर्ष बी. फार्मसीच्या ७० विद्यार्थ्यांनी १२ ऑक्टोबर रोजी कंपनीला औद्योगिक क्षेत्रभेट देऊन औषधनिर्मिती प्रक्रियेची माहिती घेतली.

फार्मसी शिक्षणाची उद्योगक्षेत्राशी सांगड घालून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीचे संस्थापक डॉ. शिवकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद खेंडके यांनी विद्यार्थ्यांना आयुर्वेदिक औषधांची निर्मिती, उत्पादन व्यवस्थापन आणि कंपनीतील विविध विभागांच्या कार्यपद्धतींची माहिती दिली. अक्षय राठोड यांनी आयुर्वेद क्षेत्रातील व्यवसायाच्या संधी आणि करिअरविषयी मार्गदर्शन केले. मयूर चव्हाण यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

फार्मसी क्षेत्रातील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांचे व्यावहारिक ज्ञान वाढविणे आणि उद्योगांशी समन्वय साधणे, या उद्देशाने सामंजस्य करार करण्यात आला. क्षेत्रभेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी छत्रपती संभाजीनगर परिसरातील प्रेक्षणीय स्थळांना भेट देऊन औषधी वनस्पतींचाही अभ्यास केला.या उपक्रमात प्रा. एस. आर. शिंदे, एन. सय्यद, एच. एस. आढाव, एस. बी. साबळे, आर. एम. दिघे आणि एम. एस. जोंधळे सहभागी झाले. या यशस्वी उपक्रमाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, प्राचार्य डॉ. धनंजय देशमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

## शासकीय जागेवरील अतिक्रमणे नियमाकुल कधी करणार ? : विरेन बोरावके



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहरातील लक्ष्मीनगर येथील शासकीय जागेवरील राहणाऱ्या नागरिकांना त्यांच्या हक्काचे उतारे मिळून त्यांची शासकीय जागेवरील अतिक्रमणे नियमाकुल करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. त्याबाबत कोपरगाव नगरपरिषदेला प्रस्ताव पण दिलेला आहे. मात्र याबाबत कोपरगाव नगरपालिका उदासीन असून लक्ष्मीनगर येथील शासकीय जागेवरील अतिक्रमणे नियमाकुल कधी करणार? असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी गटनेते विरेन बोरावके यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला आहे.

कोपरगाव शहरात लक्ष्मीनगर परिसरासह शहरातील इतर प्रभागातही मागील अनेक वर्षापासून शासकीय जागेवर अनेक कुटुंब वास्तव्य करीत आहे. ज्या शासकीय जागेवर हे कुटुंब सध्या वास्तव्य करीत आहेत त्यांना त्या जागा शासन नियमानुसार नियमाकुल करून त्यांना त्यांच्या नावचे उतारे मिळावे हा प्रश्न मागील काही वर्षापासून प्रलंबित होता. नागरिकांच्या जागा शासन नियमानुसार नियमाकुल करण्यासाठी आ.आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नगरसेवकांनी सातत्याने कोपरगाव नगरपरिषदेकडे पाठपुरावा करून वेळोवेळी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले आहे.

कोपरगाव शहरात लक्ष्मीनगरसह विविध प्रभागात शासकीय जागेवर राहत असलेल्या नागरिकांच्या अडचणीची दखल घेऊन आ.आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी कमिटीची बैठक घेऊन लक्ष्मीनगरसह इतर प्रभागातील शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागा शासकीय नियमाप्रमाणे नियमित करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून हे प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठविण्याच्या सूचना कोपरगाव नगरपरिषदेला दिल्या होत्या. त्या सुचनेनुसार कोपरगाव नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे करून, अतिक्रमित जागेची माहिती घेवून हे सर्व प्रस्ताव शासनाच्या विविध विभागाकडे मंजुरीसाठी पाठवीले होते.

आ.आशुतोष काळे यांच्या पाठपुराव्यातून शासनाच्या आवश्यक असणाऱ्या सर्व विभागांची. जवळपास सव्वा वर्षापूर्वी मंजुरी मिळाली आहे.या जागा तातडीने नियमाकुल व्हाव्यात यासाठी राष्ट्रवादी. काँग्रेसच्या वतीने कोपरगाव नगरपरिषदेला प्रस्ताव देखील देण्यात आला आहे.मात्र याबाबत कोपरगाव नगरपरिषदेचे सत्ताधारी काहीसे उदासीन असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे कोपरगाव शहराच्या लक्ष्मीनगरसह इतर प्रभागातील शासकीय जागेवर राहणाऱ्या नागरीकांना त्यांच्या जागा शासकीय नियमाप्रमाणे नियमाकुल करण्यासाठी त्या नागरिकांचा सत्ताधारी किती अंत पाहणार आहे? असा उद्विग्न सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी गटनेते विरेन बोरावके यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला आहे.

## विलास शिंदे यांची विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक :** सामाजिक कार्यकर्ते विलास शिंदे यांची महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हा दंडाधिकारी रोहितकुमार राजपूत यांच्या आदेशाने ही नियुक्ती झाली. शिंदे गेल्या ३२ वर्षांपासून लोकभारती समाजसेवा संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागात महिला बचतगट, पंचायत राज प्रचार व प्रसार तसेच विविध सामाजिक संस्थांना मार्गदर्शन करण्याचे कार्य करीत आहेत. त्यांच्या नियुक्तीबद्दल संस्थेच्या अध्यक्षा नीलिमा साठे-शिंदे यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन केले.

## नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने ११ महिलांना पैठणी साडीची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील सुरेशनगर येथे केशर उद्योग समूह आणि बजरंग युवा प्रतिष्ठानच्या वतीने नवरात्र महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महिलांसाठी मोफत भव्य लकी ड्रॉ,ऑर्केस्ट्रा आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे ४०० महिलांनी लकी ड्रॉमध्ये सहभाग घेतला.

या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमाला त्रिवेणीश्वर देवस्थानचे प्रमुख महंत स्वामी श्री रमेशानंदगिरी महाराज, पोलीस निरीक्षक प्रताप दराडे, निवृत्ती काळे, सोने चांदीचे व्यापारी विजयराव दहिवाळकर,राजकुमार पाषाण, संजूबाबा गायकवाड,पत्रकार राजेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी महिलांना निर्भय राहण्याचे आवाहन केले.

लकी ड्रॉमध्ये दहिवाळकर सराफ यांच्या वतीने तीन चांदीच्या अंगठ्या, केशर उद्योग समूहाचे संचालक अमृत उभेदळ यांच्या वतीने ११ पैठणी साड्या, तर पाषाण सुपर मार्केटतर्फे सात स्टील टिफिन बक्षीस म्हणून देण्यात आले.

प्रास्ताविक प्रेरणा उभेदळ यांनी केले.अमृत उभेदळ यांनी सूत्रसंचालन करून उपस्थित महिला भगिनी व मान्यवरांचे मानले. उत्सवाच्या आयोजनासाठी पुरस्कार विजेते माजी सरपंच पांडुरंग उभेदळ, सुरेशराव उभेदळ आणि अनिताताई उभेदळ यांनी पुढाकार घेतला. केशर उद्योग समूहाच्या वतीने सुमारे २०० महिलांसाठी श्रीक्षेत्र मोहटादेवी दर्शन यात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

## कोपरगाव नगरपरिषदेत नगरसेविका पतीने घेतली बैठक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** कोपरगाव नगरपरिषदेच्या सत्ताधारी कोल्हे गटाच्या शिक्षण समितीच्या सभापती सौ.संजना उर्फ दिपाली संजय उदावंत यांचे पती संजय उदावंत यांनी त्यांच्या पत्नीच्या सभापती पदाचा अनधिकृतपणे गैरवापर करून स्वत: सभापती असल्याच्या अविर्भावात चक्क सभापतीच्या खुर्चीवर बसून कोपरगांव नगरपरिषद वाचनालय येथे शिक्षण समितीची बैठक घेतल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसने आक्षेप नोंदवत जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी स्वरूपात निवेदन देवून सौ.संजना उर्फ दिपाली संजय उदावंत यांचे सभापतीपद रद्द करण्याची मागणी केली आहे.

दिलेल्या निवेदनात राष्ट्रवादी काँग्रेसने असे म्हटले आहे की, नगरपरिषद ही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कायदेशीर चौकटीत कार्यरत असलेली लोकशाही संस्था आहे. नगरपरिषदेतील पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी आपापल्या पदाच्या अधिकारमर्यादित राहून कामकाज करणे अपेक्षित आहे. सभापतींच्या पदाशी संबंधित अधिकारांचा वापर हा नियमानुसार अधिकृत व्यक्तीकडूनच होणे आवश्यक आहे. मात्र कोपरगाव नगरपरीषदेच्या शिक्षण

### सभापती पद रद्द करण्याची मागणी

विभागाच्या सभापतींचे पती हे स्वतः सदर पदावर नसतांना देखील त्यांनी सभापतींच्या खुर्चीवर बसून शुक्रवार (दि.१६) रोजी कोपरगाव नगरपरिषद वाचनालय येथे शिक्षण समितीची बैठक घेतली आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे. तसेच सभेच्या विषय नोंदणी रजिस्टरवर सभापती सौ.संजना उर्फ दिपाली संजय उदावंत यांच्या नावाने करण्यात आलेली सही देखील डुप्लिकेट केलेली आहे. हे अत्यंत चुकीचे असून कायदेशीर व प्रशासकीय दृष्टीने या अनधिकृत बैठकीची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. नगरसेविका सौ.संजना उर्फ दिपाली संजय उदावंत यांच्या पतीच्या अनाधिकृत बैठकीचे प्रकारण दिसते तेवढे सोपे नसून त्यामुळे कोपरगाव नगरपरिषदेच्या कामकाजातील शिस्त, पारदर्शकता आणि पदाधिकाऱ्यांच्या अधिकारमर्यादांबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. तसेच, नगरपरिषदेच्या अधिकृत कामकाजात बाह्यस्थ व्यक्तीचा हस्तक्षेप कोणत्या अधिकाराखाली करण्यात आला, बैठक कोणाच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली आणि त्या बैठकीतील निर्णयांची वैधता काय आहे, याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.या प्रकरणाची जिल्हा प्रशासनाकडून गंभीर दखल न घेतल्यास कोपरगाव नगरपरिषदेच्या कामकाजात अनधिकृत हस्तक्षेपाला एकप्रकारे प्रोत्साहन मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे आपण या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन नगरसेविका सौ.संजना उर्फ दिपाली संजय उदावंत यांचे सभापतीपद रद्द करणेबाबत गंभीरपणे विचार करावा असे राष्ट्रवादी काँग्रेसने दिलेल्या पत्रात शेवटी म्हटले असून निवेदनासोबत त्या अनाधिकृत बैठकीचे फोटो व शुक्रवार (दि.१६) रोजी झालेल्या त्या शिक्षण समितीच्या अनाधिकृत सभेच्या विषय नोंदणी रजिस्टरमधील नोंद झालेल्या सभेच्या इतिवृत्ताची झेरॉक्स प्रत,ज्यामध्ये सभापती सौ.संजना उर्फ दिपाली संजय उदावंत यांच्या नावाने करण्यात आलेली डुप्लिकेट सही जिल्हाधिकाऱ्यांच्या माहितीसाठी सोबत जोडण्यात आलेली आहे.

## निधनवार्ता

### मारुतराव सुद्रिक



**सोनई :** येथील तिळवंन तेली समाजाचे जुन्या पिढीतील वयोवृद्ध मारुतराव दगडूजी सुद्रिक (वय ८५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सुना, नातवंडे, असा परिवार आहे.
व्यापारी प्रकाश सुद्रिक यांचे ते वडील होत.

### तुळशीराम दाते



**निघोज :** वासुंदे येथील प्रगतिशील शेतकरी तुळशीराम रभाजी दाते यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा,एक मुलगी, सुना नातू पुतणे, जावई असा मोठा परिवार आहे. कुकडी डावा कालवा नारायणगाव विभागाचे निघोज शाखाधिकारी सुनिल दाते यांचे ते वडील होत.

### सिंधूबाई आहेर



**चांदा :** नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव येथील सिंधूबाई रघुनाथ आहेर (वय ७०) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती तीन मुली सून नातवंडे असा परिवार आहे अक्षय आहेर यांच्या त्या आजी होत.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**शुक्रवार दि. २३ ऑक्टोबर २०२६**

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१४० २३० ६९० | ५-२ | १५६ १२९ ११० | ५६-७२-३०-९१-२४

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१७९ १६० १३३ | ७-४ | १४९ १३० ११२ | ७६-३४-१२-९०-४८

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

४८० ५७० ६६० | २-९ | १२६ १८० ११७ | २१-०९-६७-३५-९४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 27/07/2026 to 31/07/2026 | 259 60 550 | 590 42 228 | 358 62 390 | 400 47 890 | 160 70 488 |
| 03/08/2026 to 07/08/2026 | 234 90 569 | 170 85 159 | 338 42 129 | 460 09 478 | 370 05 348 |
| 10/08/2026 to 14/08/2026 | 577 99 234 | 230 53 148 | 250 70 235 | 355 39 135 | 133 76 358 |
| 17/08/2026 to 21/08/2026 | 240 60 460 | 278 73 346 | 116 82 480 | 156 23 779 | 449 77 179 |
| 24/08/2026 to 28/08/2026 | 360 96 790 | 255 23 229 | 789 42 237 | 450 98 440 | 266 41 290 |
| 31/08/2026 to 04/09/2026 | 149 43 670 | 170 81 560 | 159 52 336 | 690 50 235 | 577 99 135 |
| 07/09/2026 to 11/09/2026 | 680 47 557 | 228 27 124 | 570 26 358 | 112 43 779 | 445 33 689 |
| 14/09/2026 to 18/09/2026 | 789 47 124 | 336 20 136 | 799 56 178 | 680 42 345 | 399 16 790 |
| 21/09/2026 to 25/09/2026 | 390 25 348 | 457 62 129 | 480 23 599 | 166 30 479 | 150 60 280 |
| 28/09/2026 to 02/10/2026 | 669 19 135 | 137 18 279 | 260 84 257 | 660 29 126 | 369 84 770 |
| 05/10/2026 to 09/10/2026 | 140 57 250 | 459 85 168 | 130 48 567 | 469 99 126 | 558 84 590 |
| 12/10/2026 to 16/10/2026 | 160 79 568 | 290 11 669 | 122 58 189 | 130 46 123 | 257 42 480 |

| माधुरी बाजार डे | माधुरी बाजार नाईट |
|---|---|
| ३४५ | ३६९ |
| २१ | ८४ |
| ६७८ | ३५६ |


# शहरांच्या चौकटीबाहेर स्क्वॉशची भरारी

## लक्ष्मीवाडीचे १६ खेळाडू विभागीय स्पर्धेसाठी पात्र

**गौरव डेंगळे | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** मोठ्या शहरांपुरता मर्यादित मानल्या जाणाऱ्या स्क्वॉश खेळात लक्ष्मीवाडीच्या ग्रामीण खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सोमैया विद्यामंदिर, लक्ष्मीवाडी येथील तब्बल १६ खेळाडूंची पुणे विभागीय स्क्वॉश स्पर्धेसाठी निवड झाली आहे. अवघ्या दीड वर्षांच्या प्रशिक्षणातून मिळालेले हे यश ग्रामीण भागातील क्रीडा गुणवत्तेची साक्ष देणारे ठरले आहे.

महाराष्ट्र राज्य क्रीडा संचालनालयाच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर आणि सोमैया विद्यामंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय जिल्हास्तरीय स्क्वॉश स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत जिल्हाभरातील दीडशेपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला. त्यात लक्ष्मीवाडीच्या खेळाडूंनी कौशल्य, चपळता आणि सातत्यपूर्ण सरावाच्या




जोरावर प्रभावी कामगिरी करत विभागीय स्पर्धेत स्थान मिळविले.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळावी, या उद्देशाने सोमैया ट्रस्टचे अध्यक्ष समीर सोमैया यांच्या पुढाकारातून लक्ष्मीवाडी येथे तीन अद्ययावत स्क्वॉश कोर्ट उभारण्यात आले आहेत. सुमारे दीड वर्षांपूर्वी मुंबई येथील स्क्वॉश प्रशिक्षक राहुल पवार यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नियमित सराव करत या खेळातील तंत्र आणि कौशल्य आत्मसात केले. त्यांना संजय धुमाळ यांचेही सहकार्य लाभले.

विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंमध्ये सोहम बोरसे, अंशुमन धुमाळ, निहार गायकवाड, अथर्व जाधव, श्रेयस यादव, समृद्धी साबळे, श्रद्धा साबळे, गुंजन होन, आराध्या आगलावे, स्फूर्ती भांगारे, समृद्धी लोंढे, विजया दहिवाळ, प्रसाद काटोरे, ऋषीकेश पवार, आर्यन बर्डे आणि आदित्य चव्हाण यांचा समावेश आहे.या यशाबद्दल समीर सोमैया, क्रीडा अकादमीचे प्रमुख एझाझ खान, आदित्य सिंग, शाळा समितीचे सचिव सुहास गोडगे, मुख्याध्यापक संजय राऊत, क्रीडा समन्वयक रोहन शिंदे, क्रीडा शिक्षक संजय अमोलिक, घनश्याम सानप व शिक्षकवृंद यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. आगामी विभागीय स्पर्धेतही हे खेळाडू चमकदार कामगिरी करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.


**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME KALIM ABDULrAHMAN SHAIKH (OLD PASSPORT NO.J3882890) & SHAIKH KALIMODDON SHAIKH A RAHEMAN (LEAVING CERTIFICATE) TO MY NEW NAMS AS KALIM ABDULRAHEMAN SHAIKH (ADHAR NO.8527 6002 1776 ) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC,SHRIRAMPUR
DATE:-22/10/2026
PALCE:-SHRIRAMPUR

# विखेंनी दिलेला शब्द पाळला जिल्हा बँकेत पानसरे बिनविरोध

## जगताप-पाचपुते यांची माघार! कारखाना निवडणुकीतील हस्तक्षेपावरून चर्चांना उधाण

**अविनाश मंत्री । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय समीकरणांना अनपेक्षित वळण मिळाले आहे. त्यात विधानपरिषद निवडणुकीच्या वेळी विखे यांनी दत्तात्रय पानसरे यांना जिल्हा बँकेचा शब्द दिला होता तो शब्द पाळण्यासाठी तालुक्यातील नाट्यमय घडामोडीमध्ये जिल्हा बँकेच्या निवडणुकीत जगताप-पाचपुते यांची माघार घेतली आणि दत्तात्रय पानसरे यांची जिल्हा बँकेवर बिनविरोध निवड झाली आहे मात्र नागवडे अजूनही रिंगणात आहेत त्यामुळे तालुक्याचे राजकारण नेमके कोणत्या वळणावर आहे याबाबत चर्चेला उधाण आले आहे

तालुक्यातून जिल्हा बँकेसाठी श्रीगोंदा तालुक्यातील सेवा संस्था मतदार संघातून जनरल जागेसाठी आमदार विक्रम पाचपुते यांचे बंधू प्रताप पाचपुते, माजी आमदार राहुल जगताप आणि दत्तात्रय पानसरे यांनी दाखल केलेल्या उमेदवारी अर्जांपैकी आता पानसरे यांच्या वाट्याला श्रीगोंद्याची जागा आली असून, त्यांची बिनविरोध निवड झाली आहे. या घडामोडींमुळे तालुक्यातील सहकार आणि राजकारणात नव्या चर्चांना सुरुवात झाली आहे.तर अनुराधा नागवडे यांचा महिला राखीव मधून उमेदवारी अर्ज कायम आहे जिल्हा बँकेच्या श्रीगोंदा येथील जागेसाठी सुरुवातीला अनेक दिग्गजांनी दंड थोपटले होते. पण विखेंच्या आणि पाचपुतेंच्या यांच्या मध्यस्थीने तालुक्यातील जिल्हा बँकेसाठी मोट बांधण्यात आली त्यातूनच पानसरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली त्यात मात्र, मध्यरात्री झालेल्या बैठकीनंतर राजकीय चित्र बदलल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत श्रीगोंदा आणि नगर तालुक्यातील प्रमुख नेते उपस्थित होते, अशी माहिती आहे. चर्चे तून झालेल्या तडजोडीनंतर जगताप आणि पाचपुते यांनी माघार घेतल्याने पानसरे यांचा बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला.जिल्हा बँकेतील बिनविरोध निवडीने संघर्ष संपला की आगामी सहकार निवडणुकांसाठी नव्या राजकीय समीकरणांची पायाभरणी झाली, याचे उत्तर येणारा काळच देईल.

राजकीय वर्तुळात चर्चिल्या जात असलेल्या माहितीनुसार, माजी आमदार राहुल जगताप यांनी आगामी कारखाना निवडणुकीत पाचपुते यांनी हस्तक्षेप करू नये, अशी अट घातल्याचे सांगितले जाते. तालुक्यातील काही सहकारी संस्थांच्या निवडणुका संबंधित नेत्यांना त्यांच्या राजकीय रणनीतीनुसार लढू द्याव्यात, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आल्याची चर्चा आहे. या अटीवरच माघारीचे गणित जुळल्याचे बोलले जात आहे.दुसरीकडे, प्रताप पाचपुते यांनीही विखे यांच्या सूचनेनुसार माघार घेतल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. विधान परिषद निवडणुकीच्या वेळी दत्तात्रय पानसरे यांना दिलेला शब्द विखे यांनी या माध्यमातून पाळल्याचेही बोलले जात आहे. त्यामुळे पानसरे यांना बिनविरोध करण्यासाठी जगताप आणि पाचपुते यांना माघार घ्यावी लागली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, जनरल महिला प्रवर्गातून अनुराधा नागवडे यांचा उमेदवारी अर्ज अद्याप कायम असल्याची माहिती आहे. त्यामुळे त्यांची पुढील भूमिका काय राहणार, याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे. तडजोडीच्या राजकारणातून नागवडे यांनी रिंगणात टिकून राहण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे.जिल्हा बँकेच्या निवडणुकीतून जगताप आणि पाचपुते यांची माघार झाली असली, तरी या निर्णयामागे नेमके कोणते राजकीय गणित आहे, याबाबत उत्सुकता वाढली आहे. जिल्हा बँकेतील एका जागेच्या तडजोडीतून आगामी कारखाना निवडणुका आणि तालुक्यातील सहकारी संस्थांच्या राजकारणाची दिशा ठरणार का, हा आता कळीचा प्रश्न बनला आहे.

# मजुरीचे पैसे मागितल्याच्या रागातून वॉचमनला लाकडी दांड्याने मारहाण

## नगरसेवक छिंदम यांच्या विरूद्ध गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** दिल्लीगेट परिसरामध्ये इमारतीच्या बांधकामावर वॉचमनचे काम करणाऱ्या एका कामगाराला हजेरीचे पैसे मागितल्याच्या कारणातून मालकाने मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संजय सखाराम निंबाळकर (वय ५७, रा. दिल्लीगेट, अहिल्यानगर) असे फिर्यादी वॉचमनचे नाव असून, श्रीपाद छिंदम (रा. दिल्लीगेट, अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या मालकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजय निंबाळकर हे गेल्या सहा महिन्यांपासून श्रीपाद छिंदम यांच्या दिल्लीगेट येथील इमारतीच्या बांधकामावर वॉचमन म्हणून काम करतात.




२१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास त्यांनी इमारतीच्या बांधकामाला पाणी मारल्यानंतर मालक श्रीपाद छिंदम तिथे आले. त्यावेळेस फिर्यादीने अडचण असल्यामुळे स्वतःच्या कामाचे एक हजार रुपये मागितले. या गोष्टीचा राग आल्याने मालक श्रीपाद छिंदम यांनी फिर्यादीला शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.

फिर्यादीने शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, आरोपीने बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणचा लाकडी दांडा उचलून त्यांच्या डाव्या हातावर मारहाण केली. तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तू लोकांमध्ये मला पैसे मागतोस का, तुला पैसे देणार नाही, असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली आणि तिथून निघून गेला. या हल्ल्यात दुखापत झाल्यानंतर फिर्यादीने जिल्हा शासकीय रुग्णालयात जाऊन प्राथमिक औषधोपचार घेतला आणि त्यानंतर थेट तोफखाना पोलीस ठाण्यात येऊन फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध मारहाण व धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## द • ख • ल

### कोजागिरी पौर्णिमेनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**निघोज :** कोजागिरी पौर्णिमा निमित्ताने निघोज परिसरातील तुकाई वस्ती येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून सोमवार दि.२६ रोजी काल्याच्या किर्तनानिमीत्ताने सकाळी १० ते १२ यावेळेत निवृती महाराज इंदूरीकर यांचे किर्तन होणार असल्याची माहिती तुकाईमळा परिसर विकास मंडळाचे अध्यक्ष भिमाशेठ घुले यांनी दिली आहे. वैभव महाराज शिंदे, किशोर महाराज कोकाटे, ज्ञानेश्वर महाराज पिंगळे, अश्विनीताई टाव्हरे, छगन महाराज खडके आदिंचे किर्तने या अखंड हरिनाम सप्ताहात होणार असून किर्तनानंतर महाप्रसाद व त्यानंतर रास दांडिया कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भावीकांनी मोठ्या संख्येने या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन घुले तसेच तुकाई वस्ती ग्रामस्थ यांनी केले आहे.

### बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात पालक मेळावा उत्साहात




**पाथर्डी शहर :** विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती, अभ्यासातील सातत्य, शिस्त आणि सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी पालक व शिक्षक यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केवळ महाविद्यालयीन शिक्षण पुरेसे नसून पालकांनीही आपल्या पाल्याला पुरेसा वेळ देत त्याच्या शैक्षणिक वाटचालीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे प्रतिपादन बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बी. ए. चौरे यांनी केले. पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या बाबुजी आव्हाड कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे, अभ्यासातील अडचणी समजून घेणे आणि पालक-शिक्षक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी करणे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्याला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी प्राचार्य डॉ. चौरे यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत पालकांची भूमिका अधोरेखित करताना सध्याच्या डिजिटल युगातील मोबाईलच्या वाढत्या वापराबाबत चिंता व्यक्त केली. विद्यार्थी मोबाईलच्या अतिवापराच्या विळख्यात अडकत असताना पालकांनीही त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. पाल्याच्या अभ्यासाकडे लक्ष देणे, त्याच्याशी नियमित संवाद साधणे आणि त्याला योग्य दिशा देणे ही पालकांची महत्त्वाची जबाबदारी आहे. आज पाल्याला दिलेला वेळ हा उद्याच्या यशाची भक्कम पायाभरणी ठरतो, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी महाविद्यालयातील शिक्षकांनी यावर्षी विद्यार्थ्यांच्या घरी गृहभेटी देऊन पालक आणि विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांच्या प्रगतीचा आढावा घेणे आणि पालकांच्या सहकार्याने शैक्षणिक वातावरण अधिक सकारात्मक बनविणे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

### ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला जातीवाचक शिवीगाळ; बेरड विरुद्ध गुन्हा

**अहिल्यानगर :** सरकारी कामात असताना ग्रामपंचायत कर्मचाऱ्याला जातीवाचक शिवीगाळ करून अपमान केल्याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात एकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाउ भानुदास बेरड (रा. दरेवाडी, ता. जि. अहिल्यानगर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, फिर्यादी महिला या दरेवाडी ग्रामलगत शासकीय सेवेत ग्रामपंचायत कर्मचारी (झाडू कामगार) म्हणून कामकाज पाहत आहेत. दिनांक २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास दरेवाडी ग्रामपंचायत कार्यालयाच्या जिन्याजवळ फिर्यादी महिला आपले शासकीय कर्तव्य बजावत असताना आरोपी भाउ बेरड तिथे आला. आरोपीला फिर्यादी व साक्षीदार हे दलित समाजाचे असल्याची पूर्ण माहिती होती. असे असतानाही आरोपीने फिर्यादी महिला शासकीय काम करत असताना त्यांच्या जातीचा व कामाचा अपमान केला. हे मांग, भंगी हे चांगले काम करत नाहीत आणि फुकटचे पगार घेतात, असे म्हणून आरोपीने फिर्यादीस व उपस्थित साक्षीदारांना जातीवाचक शिवीगाळ केली आणि सार्वजनिक ठिकाणी अपमान केला. या प्रकारानंतर पीडित महिलेने त्वरित भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. फिर्यादी महिलेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी आरोपी भाउ भानुदास बेरड याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता आणि अनुसूचित जाती, जमाती प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नगर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी करत असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पुढील कायदेशीर कारवाई करत आहेत.

# राजराजेश्वरी केदार जिल्ह्यात प्रथम इस्त्रोच्या थुंबा सहलीसाठी निवड

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर :** जिल्हा परिषद अहिल्यानगरच्या प्राथमिक शिक्षण विभागामार्फत आयोजित डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर, थुंबा शैक्षणिक सहल २०२६-२७ साठी घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय निवड चाचणीत कुरुडगाव येथील राजराजेश्वरी प्रिती अवधूत केदार हिने १९८ पैकी १८२ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशामुळे तिची इस्रोच्या थुंबा येथील शैक्षणिक सहलीसाठी निवड झाली आहे.

राजराजेश्वरी ही जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कुरुडगाव येथील विद्यार्थिनी असून, प्राथमिक शिक्षक अवधूत केदार व प्राथमिक शिक्षिका प्रिती केदार यांची कन्या आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत तिने



जिल्हास्तरावर मिळविलेल्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

तिच्या या यशाबद्दल आनंद भंडारी, भास्कर पाटील, महेश दहिफळे, शैलजा राऊळ, शंकर गाडेकर, कृष्णा शेळके, कुशाबा पलाटे व महेश बुजरे, पांडुरंग नागरे, अवधूत केदार, योगिता नारळकर-म्हस्के यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# हमालांच्या मूलभूत सुविधांचे प्रश्न सोडवा : अविनाश घुले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** नवीन रेल्वे मालधक्क्यावरील मागील दीड महिन्यांपासून बंद असलेले काम जिल्हा हमालपंचायत, सहाय्यक कामगार आयुक्त आणि हुंडेकरी यांच्यात झालेल्या चर्चेनंतर पुन्हा सुरू झाले. बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा करून परस्पर सहमतीने तोडगा काढण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रेल्वेने माल घेऊन आलेल्या गाडीचे पूजन करण्यात आले. त्यानंतर माल उतरविण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या निर्णयामुळे हमाल-माथाडी कामगार, मुकादम आणि हुंडेकरी यांच्यासह मालधक्क्याशी संबंधित घटकांना दिलासा मिळाला आहे. जिल्हा हमालपंचायतीच्या माध्यमातून सर्व संबंधितांना एकत्र आणून हा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. मागील



दीड महिन्यांपासून काम बंद असल्यामुळे कामगारांच्या रोजगारावर परिणाम झाला होता, तसेच मालधक्क्याशी संबंधित व्यावसायिकांचेही नुकसान होत होते. त्यामुळे कामकाज पुन्हा सुरू करण्यासाठी सर्वांनी चर्चे च्या माध्यमातून मार्ग काढण्याची भूमिका घेतली. सहाय्यक कामगार आयुक्त रेवणनाथ भिसले यांच्या उपस्थितीत झालेल्या चर्चेत कामगारांच्या अडचणी, माल उतरविल्यानंतरची जबाबदारी, कामाचा हिशेब आणि परस्परांमधील कराराच्या अटी यांसारख्या मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यानंतर काम पुन्हा सुरू करण्याबाबत सहमती झाल्याने मालधक्क्यावरील कामकाज पूर्ववत झाले.

जिल्हा हमालपंचायतीचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी यावेळी कामगारांच्या प्रश्नांबाबत भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, गेल्या दीड महिन्यांपासून काम बंद असल्यामुळे सर्वांचेच अतोनात नुकसान झाले आहे. हमाल-माथाडी कामगार, मुकादम, हुंडेकरी आणि मालधक्क्याशी संबंधित व्यावसायिक हे एकमेकांवर अवलंबून आहेत. त्यामुळे कोणत्याही एका घटकाचा विचार करून निर्णय घेण्याऐवजी सर्वांच्या हिताचा विचार केला पाहिजे. यापुढे कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास मुकादम आणि संघटनेच्या प्रतिनिधींनी एकत्र बसून चर्चा करावी आणि त्यातून मार्ग काढावा. परस्परांमध्ये समन्वय राहिल्यास कामकाज बंद ठेवण्याची वेळ येणार नाही. नवीन रेल्वे मालधक्क्यावर काम करणाऱ्या हमाल-माथाडी कामगारांना आवश्यक त्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. मालधक्क्यावर कामगारांसाठी छताची व्यवस्था, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा आणि स्वच्छ शौचालय उपलब्ध करून देण्यात यावे.

# धार्मिक कार्यातून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचतात : आ. जगताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** शहरातील पाइपलाइन रोड येथील श्री जय तुळजाभवानी माता मंदिरात सभामंडपाच्या कामाचे भूमिपूजन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची सोय व्हावी, तसेच वर्षभर धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करता यावे, या उद्देशाने देवस्थानच्या वतीने सभामंडप उभारण्यात येत आहे. या सभामंडपामुळे भाविकांची गैरसोय दूर होण्यास मदत होणार असून, धार्मिक कार्यक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध होणार आहे.

आ. जगताप म्हणाले की, श्री जय तुळजाभवानी माता मंदिर हे अहिल्यानगर शहरातील भाविकांचे श्रद्धास्थान असून, येथे दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येत असतात. भाविकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने सभामंडपाचे काम हाती घेण्यात आले आहे. या सभामंडपाच्या माध्यमातून वर्षभर विविध धार्मिक, आध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील.धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून संतांचे विचार समाजापर्यंत पोहोचविले जातात. संतांचे विचार समाजाला योग्य दिशा देण्याचे काम करतात. सण-उत्सवांच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जपली जाते. हा सांस्कृतिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी



आपल्या सर्वांची आहे. देवस्थानच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या सभामंडपाच्या कामासाठी सर्वतोपरी सहकार्य राहील, असे आश्वासन आमदार जगताप यांनी दिले. धनश्री सुजय विखे पाटील म्हणाल्या की, धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील नागरिक एकत्र येतात आणि विचारांची देवाणघेवाण करतात. सभामंडपाच्या उभारणीमुळे मंदिरात विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम अधिक उत्साहात आयोजित करता येतील. यामुळे भाविकांची गैरसोय दूर होऊन त्यांना कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी चांगली सुविधा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले. देवस्थानचे संस्थापक अशोक कानडे म्हणाले की, श्री तुळजाभवानी माता मंदिर हे अहिल्यानगरची देवी म्हणून ओळखले जाते. मंदिर परिसरात भव्य सभामंडप उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या कामासाठी भक्तगणांनी सहकार्य करावे. सभामंडपामुळे भाविकांची गैरसोय दूर होणार असून, वर्षभर विविध धार्मिक आणि आध्यात्मिक उपक्रमांसाठी या जागेचा उपयोग करता येणार आहे, असे त्यांनी सांगितले.

# यशवंत गाडे विद्यालयात मुलांनी बनवला ' बिन भांड्याचा स्वयंपाक '

## स्काऊट - गाईड अंतर्गत निसर्ग निवास शिबीर



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** मुकुंदनगर येथील यशवंतराव गाडे विद्यालयात स्काऊट - गाईड अंतर्गत एक दिवसीय निसर्ग निवास शिबीर उत्साहात पार पडले. यात मुलांनी बनवलेला बिन भांड्याचा स्वयंपाक लक्षवेधी ठरला.

विद्यालयातील आठवी ते दहावीच्या स्काऊट - गाईडच्या मुलांनी या शिबीरात सहभाग घेतला. मुलांना निसर्ग निवासाचा अनुभव मिळावा व पर्यावरणाची गोडी निर्माण व्हावी यासाठी हे शिबीर घेण्यात आले. यात मुलांनी स्वतः तंबू उभारून निसर्ग निवासाचा अनुभव घेतला. या शिबीराचे उदघाटन जेष्ठ पत्रकार व अहिल्यानगर प्रेस क्लबचे अध्यक्ष विठ्ठल लांडगे यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले की ,विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवणारा व निसर्गा विषयी आपुलकी वाढवणारा हा उपक्रम कौतुकास्पद असुन यामुळे पर्यावरणाविषयी आस्था निर्माण होत आहे.

यावेळी मुलांनी स्वतः बिन भांड्याचा स्वयंपाक बनवला. सर्वधर्मसमभाव, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती असे विविध संदेश देत मुलांनी या शिबीराचा आनंद लुटला. मुख्याध्यापिका संगिता बनकर यांनी या शिबीराचे आयोजन केले होता.

# जलजीवन योजनेतून मुदळ वस्तीला जाणीवपूर्वक वगळले?

## संपूर्ण अरणगावला पाणी, मात्र मुदळ वस्ती तहानलेली!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** एकीकडे शासनाच्या जलजीवन मिशनमधून 'हर घर जल'चा गाजावाजा केला जात असताना, दुसरीकडे नगर तालुक्यातील अरणगाव येथील मुदळ वस्तीला मात्र पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. संपूर्ण गावात जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे करण्यात आली; मात्र सुमारे ३०० नागरिकांची मागास वस्ती असलेल्या मुदळ वस्तीला या योजनेतून वगळण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सध्या दुष्काळी परिस्थिती असताना या वस्तीतील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर संताप व्यक्त होत आहे.

अरणगावमध्ये जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठ्याची कामे झाली; मात्र मुदळ वस्तीपर्यंत पाणीपुरवठ्याची पाइपलाइन टाकण्यात आली नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. संबंधित वस्तीचा योजनेच्या अंदाजपत्रकात आणि निविदेच्या कामात समावेश नसल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे गावातील इतर भागांना पाण्याची सुविधा मिळत असताना मुदळ वस्तीतील नागरिकांना मात्र मूलभूत सुविधेपासून वंचित राहावे लागत आहे.

मुदळ वस्तीला जलजीवन मिशनच्या पाणीपुरवठ्यापासून वंचित ठेवण्यात आल्याप्रकरणी ग्रामस्थांनी सरपंचांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. वस्तीचा योजनेत समावेश होऊ नये, यासाठी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले का? वस्तीचा समावेश करण्याची मागणी असतानाही त्याकडे दुर्लक्ष का झाले? या प्रश्नांची उत्तरे ग्रामस्थांना हवी आहेत. मात्र, या आरोपांची स्वतंत्र चौकशी होऊन वस्तुस्थिती स्पष्ट होणे आवश्यक आहे.

या संपूर्ण प्रकरणातील सर्वाधिक गंभीर बाब म्हणजे सध्या दुष्काळी परिस्थितीत मुदळ वस्तीला पिण्याचे पाणी उपलब्ध होत नसल्याची तक्रार आहे. ग्रामस्थांनी टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची मागणी केल्यास, 'तुमचे गाव जलजीवन मिशनमध्ये आहे,' असे सांगून टँकर देता येणार नसल्याचे उत्तर मिळत असल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, योजनेत गावाचा समावेश असणे आणि प्रत्येक वस्तीपर्यंत प्रत्यक्ष पाणी पोहोचणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. पाइपलाइनच नसलेल्या वस्तीला केवळ कागदोपत्री योजनेचा आधार देऊन टँकर नाकारणे कितपत योग्य आहे? पाणीपुरवठ्याची सुविधा प्रत्यक्ष उपलब्ध नसताना नागरिकांनी पाणी आणायचे तरी कुठून, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

मुदळ वस्तीतील नागरिकांनी या समस्येबाबत ग्रामपंचायतीपासून वरिष्ठ अधिकारी आणि लोकप्रतिनिधींपर्यंत पाठपुरावा केल्याचे निवेदनात म्हटले आहे. ग्रामपंचायत अरणगाव येथे यापूर्वी अर्ज करूनही प्रश्न सुटलेला नसल्याची त्यांची तक्रार आहे. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळी उत्तरे मिळत असल्याने नेमकी जबाबदारी कोणाची, असा प्रश्न आता निर्माण झाला आहे. नगर तालुका पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि जलजीवन मिशनच्या संबंधित अधिकार्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालणे गरजेचे आहे. मुदळ वस्तीचा योजनेत समावेश का झाला नाही? मंजूर अंदाजपत्रकात आणि निविदेत या वस्तीचा समावेश होता की नव्हता? नसेल, तर त्यामागचे कारण काय? या प्रक्रियेत कोणाची भूमिका होती? तसेच वस्तीला पाणी मिळू नये यासाठी कोणाचा दबाव होता का, याचीही निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे.

मुदळ वस्तीतील विहिरींचे पाणी आटल्याने पिण्याच्या पाण्याची समस्या अधिक गंभीर झाल्याचे ग्रामस्थांनी निवेदनात नमूद केले आहे.

# पदवीधर, शिक्षक मतदारसंघांसाठी मतदान पथके साहित्य घेऊन केंद्रांकडे रवाना

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्र विधान परिषदेच्या पुणे विभाग पदवीधर व शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी पुणे जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. मतदानासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची पथके आवश्यक मतदान साहित्य ताब्यात घेऊन संबंधित मतदान केंद्रांकडे रवाना झाली आहेत. शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत जिल्ह्यातील २३२ मतदान केंद्रांवर मतदान होणार आहे. मतदान प्रक्रिया शांततेत, सुरळीत आणि पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून केंद्रनिहाय नियोजन करण्यात आले आहे.



**पदवीधरांसाठी १६०, शिक्षकांसाठी ७२ केंद्रे**

पुणे जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी १६०, तर शिक्षक मतदारसंघासाठी ७२ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. पदवीधर मतदारसंघात ४७, तर शिक्षक मतदारसंघात ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. दोन्ही मतदारसंघांतील मतदानासाठी आवश्यक मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले असून, मतदान साहित्याचे वितरणही पूर्ण करण्यात आले आहे.

**दोन्ही मतदारसंघांत १ लाखांहून अधिक मतदार**

जिल्ह्यात पदवीधर मतदारसंघासाठी ८८ हजार २०२, तर शिक्षक मतदारसंघासाठी १६ हजार ८८२ मतदारांची नोंदणी झाली आहे. दोन्ही मतदारसंघांत मिळून १ लाख ५ हजार ८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी मतदान केंद्रांवरील व्यवस्था आणि आवश्यक सुविधांकडे प्रशासनाने लक्ष दिले आहे.

**मतदान साहित्य वितरणासाठी स्वतंत्र व्यवस्था**

मतदान साहित्याचे वितरण, मतदानानंतर साहित्य स्वीकारणे आणि सुरक्षित ठेवण्यासाठी पुणे शहरासह विविध तालुक्यांसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. पुरंदरसाठी नवीन प्रशासकीय इमारत, पारगाव रोड; हवेलीसाठी सिंहगड महाविद्यालय, आंबेगाव; पुणे शहरासाठी श्री गणेश कला क्रीडा रंगमंच, स्वारगेट येथे व्यवस्था आहे. मावळ-मुळशीसाठी संबंधित तहसील कार्यालये, भोर-वेल्ह्यासाठी भोर तहसील कार्यालयातील पुरवठा शाखा, तसेच दौंड, जुन्नर आणि खेड येथे संबंधित तहसील कार्यालयांत व्यवस्था करण्यात आली आहे. बारामती-इंदापूरसाठी बारामती येथील अभियांत्रिकी भवन निश्चित करण्यात आले आहे. मतदान पूर्ण झाल्यानंतर साहित्य सुरक्षितपणे जमा करण्याची व्यवस्थाही करण्यात आली आहे. मतदान प्रक्रिया व्यवस्थित पार पडावी, यासाठी अधिकारी आणि कर्मचारी यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

**२७ ऑक्टोबरला मतमोजणी**

भारत निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमानुसार, २३ ऑक्टोबर रोजी मतदान, तर २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. मतदारांनी निर्धारित वेळेत संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित राहून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन निवडणूक यंत्रणेमार्फत करण्यात आले आहे.

# कोंढापुरीत खुनाचा थरार; तरुणावर चाकूने २० वार

## शिक्रापूर पोलिसांकडून १२ तासांत आरोपीचा शोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :** शिरूर तालुक्यातील कोंढापुरी येथे खंडोबा मंदिरासमोरील तलावाच्या कडेला एका २४ वर्षीय तरुणाचा धारदार शस्त्रांनी वार करून निर्घृण खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली होती महेंद्र लव सकट वय २४, रा. रांजणगाव गणपती, ता. शिरूर असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे.

या घटनेचा शिक्रापूर पोलिसांनी अवघ्या १२ तासांत छडा लावला असून एका आरोपीला अटक केली आहे तर दोन बालकांना तपासासाठी ताब्यात घेतले आहे. तलावाच्या कडेला रक्ताच्या थारोळ्यात एक मृतदेह बुधवार दि २१ ऑक्टोबर रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास कोंढापुरी गावच्या हद्दीतील खंडोबा मंदिरासमोरील तलावाच्या कडेला एका अनोळखी तरुणाचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात पडल्याची माहिती शिक्रापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांना मिळाली. माहिती मिळताच कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतमृतदेहाची पाहणी केली असता तरुणाच्या शरीरावर धारदार शस्त्राने वार केल्याच्या अनेक जखमा आढळून आल्या त्यानंतर मृताची ओळख पटविण्यासाठी पोलिसांनी दोन पथके रवाना केली.




तपासादरम्यान मृत तरुणाची ओळख महेंद्र लव सकट अशी पटल्या याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून.गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी तीन तपास पथके तयार करून सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक तपास आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू करण्यात आला या तपासात रांजणगाव गणपती परिसरातील तीन संशयितांचा सहभाग असल्याची माहिती पोलिसांना मिळाली

दरम्यान संशयित आरोपी अहिल्यानगर जिल्ह्यात पळून गेल्याची माहिती मिळाल्यानंतर शिक्रापूर पोलिसांचे पथक त्या दिशेने रवाना झाले होते. पोलिसांनी बेलापूर बायपास ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर येथे शोध घेतला असता तिन्ही संशयित मिळून आले आहे.त्यांच्याकडे चौकशी केली असता प्रथमेश नानासाहेब राऊत रा. फंडवस्ती रांजणगाव गणपती ता. शिरूर; मूळ रा. ढोकसांगवी, ता. शिरूर याच्यासह दोन बालकांचा या प्रकरणातील सहभाग निष्पन्न झाल्याची माहिती पोलिसांनी दिली असून. प्रथमेश राऊत याला अटक करण्यात आली असून दोन्ही बालकांना तपासासाठी ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, मृत तरुण आरोपी आणि दोन्ही बालके एकमेकांच्या परिचयातील होते त्यातील एका बालकाचे आणि मृत तरुणाचे कोणासोबत फिरायचे व कोणाशी बोलायचे यावरून वाद होते. याच वादातून खुनाचा कट रचल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.मृत महेंद्र सकट याला गांजा पिण्याचे आमिष दाखवून निर्जनस्थळी नेण्यात आले तेथे दोन चाकूंनी त्याच्या शरीरावर १८ ते २० वेळा वार करून त्याचा खून केल्याची माहिती तपासात समोर आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, अपर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार आणि शिरूर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून.शिक्रापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक उमाकांत कुंजीर, जिनेश कोळी, अंकुश कारंडे तसेच पोलीस हवालदार अमोल दांडगे, रोहिदास पारखे, शिवाजी चितारे, विश्वंभर वाघमारे, अमोल चव्हाण आणि पोलीस कॉन्स्टेबल राम जाधव, नारायण वाळके, मच्छिंद्र निचित यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांनी या तपासात सहभाग घेतला होता.या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक हनमंतराव गिरी पोलीस हवालदार नितीन सुद्रिक आणि पोलीस कॉन्स्टेबल राहुल गडदे हे करीत आहेत.

द • ख • ल

## सणसवाडीत भंगारच्या दुकानाला भीषण आग

**तळेगाव ढमढेरे :** सणसवाडी ( ता. शिरुर) येथील कृष्णलीला मंगल कार्यालय जवळ असलेल्या एका भंगारच्या दुकानाला भीषण आग लागल्याची घटना घडली असून आपदा मित्र व शिक्रापूर पोलिसांच्या तत्परतेने आगीवर नियंत्रण आणण्यात यश आल्याने पुढील अनर्थ टळला आहे. सणसवाडी (ता.शिरूर) येथील कृष्णलीला मंगल



सणसवाडी (ता. शिरूर) येथे भंगार दुकानाला लागलेली भीषण आग व आगीवर नियंत्रण मिळवणारे आपदा मित्र.(छायाचित्र आकाश भोरडे)

कार्यालय जवळ असलेल्या इरफान खान यांच्या भंगारच्या दुकानाला २२ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास अचानकपणे मोठी आग लागली, याबाबतची माहिती मिळताच आपदा मित्र शेरखान शेख, श्रीकांत भाडळे, वैभव निकाळजे, राहुल गायकवाड, पोलीस हवलदार गणेश कुदळे, गणपत होले, ललित चक्रनारायण यांनी घटनास्थळी धाव घेतली, दरम्यान आपदा मित्रांनी किरण हरगुडे, अजय मोढे, उमाकांत क्षीरसागर, दत्ता भुजबळ, बंटी साकोरे यांसह आदींच्या मदतीने पाण्याच्या सहाय्याने आगीवर नियंत्रण आणल्याने दुकानातील हजारो रुपयांचे साहित्य बचावले गेले, दरम्यान उपस्थित नागरिक व पोलिसांनी आपदा टीमचे आभार मानले.

## सेवा सेतू अभियानात २५७८ ग्राहकांनी घेतला सूर्यघर योजनेचा लाभ

**पुणे :** महावितरणच्या सेवा सेतू अभियानांतर्गत पुणे परिमंडलात प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेच्या २५७८ वीजजोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. तसेच ६०,८०४ वीजपुरवठा तक्रारी आणि ११,९९२ वीजबिल तक्रारी निकाली काढण्यात आल्या असून, ग्राहकांच्या नावात बदल करण्याची ४५१२ प्रकरणे पूर्ण करण्यात आली आहेत. वीजपुरवठा यंत्रणा सक्षम करण्यासाठी २३४ रोहित्रेही बदलण्यात आली आहेत. महावितरणचे कार्यकारी संचालक दिनेश अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पुणे परिमंडलाचे प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेअंतर्गत गणेशखिंड मंडलात ७१४, पुणे ग्रामीण मंडलात १११८ आणि रास्तापेठ मंडलात ७४६ वीजजोडण्या कार्यान्वित झाल्या आहेत. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेअंतर्गत ३१६ सौर कृषी पंप कार्यान्वित करण्यात आले असून, स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलार (डचअठढ) योजनेअंतर्गत ११ वीजजोडण्या देण्यात आल्या आहेत.

## घोड धरण परिसरात चार तास वीज द्या ; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**पुणे :** शिरूर तालुक्यातील घोड धरणाच्या बॅकवॉटर परिसरातील चिंचणीसह गुणाट, शिंदोडी, निमोणे, गोलेगाव, तांदळी आणि तोंबाचीवाडी या गावांतील शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच नागरिक आणि जनावरांच्या पिण्याच्या पाण्यासाठी दररोज किमान चार तास अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर कटके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राङ रे केली आहे.

या परिसरातील शेतीचा वीजपुरवठा खंडित झाल्याने शेतकऱ्यांना उभ्या पिकांना पाणी देण्यात अडचणी येत आहेत. सध्या पावसाअभावी निर्माण झालेल्या टंचाईच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी कष्टाने उभी केलेली पिके वाचविण्यासाठी सिंचनाची आवश्यकता आहे. मात्र, वीजपुरवठा उपलब्ध होत नसल्याने रब्बी हंगामातील पिकांना वेळेवर पाणी देणे कठीण झाले आहे. परिणामी, पिकांचे नुकसान होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन महावितरण आणि संबंधित विभागांना दररोज किमान चार तास अखंडित वीजपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने निर्देश द्यावेत. तसेच उभ्या पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आणि रब्बी हंगामातील सिंचन सुरळीत होण्यासाठी या मागणीवर सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती आमदार कटके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# टंचाईच्या सावटात दिवाळी गोड होणार ?

## आनंदाचा शिधा मिळणार का, याकडे राज्यातील जनतेचे लक्ष

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**यवत :** - राज्यात यंदा पडलेला अपुरा पाऊस आणि काही भागांतील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिक आधीच आर्थिक विवंचनेत आहेत. अशा परिस्थितीत वर्षभरातील सर्वात मोठा सण असलेल्या दिवाळीत गरिबांची दिवाळी गोड होणार का, आणि सरकारकडून 'आनंदाचा शिधा' मिळणार का, याकडे राज्यातील कोट्यवधी शिधापत्रिकाधारकांचे (ठरींळेप उरॲव केश्रवशऔ) डोळे लागले आहेत.

गेल्या काही वर्षांत राज्य शासनाने दिवाळी, गुढीपाडवा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त केवळ १०० रुपयांत आनंदाचा शिधा देण्याची योजना राबवली आहे. यामध्ये प्रामुख्याने १ किलो चणाडाळ, १ किलो साखर, १ किलो रवा आणि १ लीटर पामतेल अशा अन्नधान्यांचा समावेश असतो. यंदा मात्र अद्याप याबाबत अधिकृत घोषणा न झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

**दुष्काळामुळे मागणीत वाढ होण्याची शक्यता:**

यंदा ग्रामीण भागात शेतीचे मोठे नुकसान झाले असून, हाताला काम नसल्याने मजुरांचे आणि शेतकऱ्यांचे बजेट कोलमडले आहे. बाजारात डाळी, तेल आणि साखरेचे भाव गगनाला भिडले आहेत. अशा महागाईच्या काळात जर सरकारने १०० रुपयांत आनंदाचा शिधा दिला, तर राज्यातील अंत्योदय अन्न योजना आणि प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना मोठा दिलासा मिळू शकतो.

**नागरिकांची सरकारकडे आर्त हाक :**

''दुष्काळामुळे यंदा शेतातून काहीच उत्पन्न मिळाले नाही. बाजारपेठेत वस्तू खूप महाग झाल्या आहेत. सरकारने दरवर्षीप्रमाणे यंदाही आनंदाचा शिधा वेळेत उपलब्ध करून दिला, तरच आमची दिवाळी साजरी होऊ शकेल,'' अशी भावना ग्रामीण भागातील महिलांनी व्यक्त केली आहे.

**प्रशासकीय हालचालींना वेग?:**

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, खाद्य व नागरी पुरवठा विभागाकडून या संदर्भातील प्रस्ताव मंजुरीसाठी विचाराधीन आहे. मात्र, ऐन दिवाळीच्या तोंडावर तांत्रिक अडचणी किंवा निविदा प्रक्रियेतील विलंबाचा फटका या योजनेला बसू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. आता मुख्यमंत्र्यांच्या अंतिम निर्णयाकडे आणि कॅबिनेटच्या मंजुरीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

सरकार दुष्काळाच्या या कठीण काळात जनतेच्या पाठीशी उभे राहून दिवाळीपूर्वी 'आनंदाचा शिधा' वाटप करणार की नाही, याचा निर्णय पुढील एक-दोन दिवसांत स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## मतदानासाठी ११ प्रकारचे ओळखीचे पुरावे ग्राह्य : शीतल उगले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे:** विधान परिषद निवडणुकीच्या पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक मतदार संघांच्या निवडणुकीत मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्राव्यतिरिक्त इतर १० पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांनी दिली आहे. पुणे विभाग पदवीधर आणि पुणे विभाग शिक्षक या दोन्ही मतदार संघांसाठी शुक्रवार २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर श्रीमती तेली-उगले यांनी ही माहिती दिली आहे. छायाचित्र असलेले मतदार ओळखपत्र आहे असे मतदार मतदान केंद्रावर त्यांची ओळख पटविण्यासाठी मतदार ओळखपत्र सादर करतील. मतदार ओळखपत्र (इपीक) सादर करू शकणार नाहीत अशा मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १० पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. आधार कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), पॅन कार्ड, पारपत्र (पासपोर्ट), केंद्र अथवा राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा इतर खासगी औद्योगिक संस्थांङ रे त्यांच्या कर्मचाऱ्यांना दिलेले सेवा ओळखपत्र, खासदार, आमदार किंवा विधान परिषद सदस्य यांना दिलेली अधिकृत ओळखपत्रे, संबंधित शिक्षक/पदवीधर मतदार संघातील मतदार ज्या शैक्षणिक संस्थांमध्ये कार्यरत आहेत, त्या शैक्षणिक संस्थांनी जारी केलेले सेवा ओळखपत्र, विद्यापीठाङ रे वितरीत मूळ पदवी/पदविका प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले शारीरिक दिव्यांगात्वाचे मूळ प्रमाणपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाने जारी केलेले युनिक डिसॅबिलिटी ओळखपत्र हे पुरावे मतदानासाठी ग्राह्य धरले जाणार आहेत.मतदारांनी मतदार ओळखपत्र किंवा वरीलपैकी एक ओळखीचा पुरावा सोबत ठेवून मतदानाचा हक्क प्राधान्याने बजवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त तेली- उगले यांनी केले आहे.

## नाना, तुम्ही गेलात, आमचा आधार हरपला !

### शिरूरकरांकडून नाना पाटेकर यांना श्रद्धांजली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** आपल्या अभिनयातून वास्तवाचे दर्शन घडविणारे आणि सामाजिक बांधिलकीतून वंचित, गरजू व शेतकरी बांधवांच्या दुःखाला आधार देणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा देत शिरूरमध्ये सामूहिक श्र द्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी त्यांच्या अभिनयासह सामाजिक कार्याचा गौरव करण्यात आला. नानांच्या जाण्याने कलाविश्वाबरोबरच सामाजिक क्षेत्रातील एका संवेदनशील व्यक्तिमत्त्वाची पोकळी निर्माण झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

शिरूर बसस्थानकाजवळील शिवसेना मंदिर सभागृहात झालेल्या या सभेत नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे आणि ज्येष्ठ रंगकर्मी विलासराव गोसावी यांच्या हस्ते नाना पाटेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मनःशांती छात्रालयाचे विनायक सपकाळ यांनी नाना पाटेकर यांच्याशी संबंधित आठवणी सांगताना भावनांना वाट मोकळी करून दिली. छात्रालयातील मुलांना भेटण्यासाठी नानांनी आश्वासन दिले होते. मात्र, त्यांच्या निधनामुळे ही भेट आता होऊ शकणार नाही, याची खंत त्यांनी व्यक्त केली. 'नाना, तुम्ही गेलात, आमचा आधार गेला!' या शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. सामाजिक संस्थांना मदतीचा हात देणारे आणि गरजूंच्या पाठीशी उभे राहणारे व्यक्तिमत्त्व हरपल्याची वेदना त्यांच्या शब्दांतून व्यक्त झाली. डॉ. दीपक गायकवाड यांनी शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी नाना पाटेकर यांनी केलेल्या कार्याचा उल्लेख केला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत त्यांची तळमळ आणि सामान्य माणसाच्या दुःखाशी जोडलेली त्यांची नाळ यामुळे त्यांचे सामाजिक कार्य कायम स्मरणात राहील, असे त्यांनी नमूद केले. ज्येष्ठ रंगकर्मी विलास गोसावी यांनी नाना पाटेकर यांच्या अभिनयातील योगदानाचा आणि सामाजिक कार्याचा गौरव केला. त्यांच्या भूमिका केवळ मनोरंजन करणाऱ्या नव्हत्या, तर समाजातील वास्तव मांडून विचार करायला लावणाऱ्या होत्या, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनी माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि अभिनेते नाना पाटेकर यांच्या कार्याचा उल्लेख करत दोघांनीही सामान्य माणसासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याचे सांगितले. २०२६ मध्ये या दोन्ही व्यक्तिमत्त्वांच्या निधनाने समाजाची मोठी हानी झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ज्येष्ठ पत्रकार नितीन बारवकर यांनी नाना पाटेकर यांच्याशी झालेल्या व्यक्तिगत भेटीचा अनुभव सांगितला. यावेळी योगेश जामदार, आबिद शेख, संजय बारवकर, प्राचार्य डॉ. समीर ओंकार, डॉ. वैशाली साखरे, प्रितेश फुलडाळे आदींनी श्र द्धांजली अर्पण केली.

## दुष्काळाने नर्सरी व्यवसायाचेही कंबरडे मोडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

एकीकडे पावसाअभावी शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत आहेत, तर दुसरीकडे शेतकऱ्यांना रोपे पुरविणारा नर्सरी व्यवसायही अडचणीत आला आहे. त्यामुळे पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नर्सरी व्यवसायांचे आर्थिक गणितही बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे. शाम बढेकर माऊली हायटेक नर्सरी जारकरवाडी

**लोणी धामणी :** पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीचा फटका आता शेतीपूरक व्यवसायांनाही बसू लागला आहे. उत्तर पुणे जिल्ह्यातील नर्सरी व्यवसायावर दुष्काळाचे सावट पसरले असून, रोपांच्या मागणीत घट झाल्याने नर्सरी व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतकऱ्यांपाठोपाठ आता नर्सरी व्यावसायिकांनाही दुष्काळाचा मोठा फटका सहन करावा लागत आहे. उत्तर पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर भाजीपाला तसेच वेलवर्गीय पिकांची लागवड केली जाते. त्यामुळे दरवर्षी नर्सरीमधील विविध प्रकारच्या रोपांना मोठ्या प्रमाणात मागणी असते. मात्र, चालू वर्षी पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने अनेक भागांत पाणीटंचाई आणि दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, पाण्याची उपलब्धता आणि पिकांच्या भवितव्याबाबत अनिश्चितता वाढल्याने शेतकरी लागवडीबाबत सावध भूमिका घेत आहेत. शेतकऱ्यांकडून रोपांची मागणी कमी झाल्यास त्याचा थेट परिणाम नर्सरी व्यवसायावर होणार आहे. रोपांची निर्मिती, बियाणे, खते, औषधे, पाणीपुरवठा व्यवस्था आणि कामगारांवर व्यावसायिकांना मोठा खर्च करावा लागतो. हा खर्च आधीच करून ठेवलेला असताना रोपांची विक्री अपेक्षेप्रमाणे न झाल्यास गुंतवलेले भांडवल अडकण्याची भीती निर्माण झाली आहे. नर्सरी व्यवसायावर अवलंबून असलेल्या कामगारांच्या रोजगाराचाही प्रश्न गंभीर बनू शकतो. रोपांची मागणी घटल्यास कामाचे प्रमाण कमी होऊन कामगारांच्या रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित न राहता शेतीशी संबंधित विविध व्यवसायांवरही होत असल्याचे चित्र दिसत आहे.

## केंदूरच्या शेतकरी कुटुंबातील भावंडांचे भरीव यश

### प्राजक्ता ताठे वरिष्ठ अधिकारी तर प्रणव ताठे ॲसेंचरमध्ये

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**तळेगाव ढमढेरे, :** केंदूर (ता. शिरूर) येथील प्राजक्ता ताठे व प्रणव ताठे या भावंडांनी ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण घेऊन परिस्थितीवर मात करुन उच्च शिक्षणाच्या जोरावर यश संपादन केले असून प्राजक्ता तुकाराम ताठे हिची भारत सरकारच्या हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये वरिष्ठ विक्री अधिकारी म्हणून तर प्रणव तुकाराम ताठे याची आंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲक्सेंचर कंपनीत उच्चपदावर नियुक्ती झाली आहे. केंदूर (ता. शिरूर) येथील प्राजक्ता ताठे व प्रणव ताठे या भावंडांनी गावात ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण घेऊन प्राजक्ता हिने पिंपरी चिंचवड येथील एमआयटी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनिअरिंग व एमबीएचे शिक्षण पूर्ण करुन मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर पहिल्याच प्रयत्नात हिंदुस्तान पेट्रोलियममध्ये वरिष्ठ विक्री अधिकारी पद मिळवले. तर प्रणव याने भोसरी व निगडी येथून अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण करुन देशातील नामांकित आयआयएम कलकत्ता संस्थेतून एमबीएची पदवी मिळवून उच्च शिक्षणाच्या बळावर त्याने देखील पहिल्याच प्रयत्नात ॲसेंचर या आंतरराष्ट्रीय कंपनीत उच्चपदावर नियुक्ती मिळवत कुटुंबाचा गौरव वाढवला आहे. यश मिळवणाऱ्या या दोन्ही भावंडांची पार्श्वभूमी शेतकरी कुटुंबातील असून, शिक्षण व कष्टांच्या बळावर त्यांनी यश संपादन केले असताना आज देखील एकत्र कुटुंबपद्धती जपणारे ताठे कुटुंब परिसरात आदर्श मानले जाते . असून त्यांचे वडील तुकाराम ताठे हे समता परिषदेच्या भोसरी विभागाचे अध्यक्ष असून ते टाटा मोटर्समध्ये कार्यरत होते, ग्रामीण भागात शिक्षणाची सुरुवात करून उच्च शिक्षण आणि व्यावसायिक क्षेत्रात यश मिळविणाऱ्या या भावंडांच्या कामगिरीचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

# दुष्काळ निवारणासाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना

## दुष्काळग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत देण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन कष्टकरी आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र दुष्काळ निवारण आणि निर्मूलन समितीची स्थापना करण्यात आली. पुण्यातील एस. एम. जोशी सोशलिस्ट फाउंडेशन येथे झालेल्या राज्यस्तरीय दुष्काळ आढावा बैठकीत हा निर्णय जाहीर करण्यात आला. दुष्काळग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत, रोजगार, पाणी, चारा आणि अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

ज्येष्ठ समाजवादी कार्यकर्ते सुभाष वारे यांनी बैठकीचे प्रास्ताविक केले. शासनाने २५ सप्टेंबर रोजी दुष्काळासंदर्भात निर्णय जाहीर केला असला, तरी शेतकरी, शेतमजूर, एकल महिला, आदिवासी, भटके-विमुक्त आणि छोट्या व्यावसायिकांच्या प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीत विविध जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनी दुष्काळाच्या गंभीर परिणामांकडे लक्ष वेधले. तलाव कोरडे पडत असून पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याची टंचाई वाढण्याची शक्यता आहे. खरीप हंगामाला फटका बसल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक संकट तीव्र झाले असून रब्बीच्या पेरण्यांबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली. ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे स्थलांतर, विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि पशुधनासाठी चारा-पाण्याचा प्रश्नही मांडण्यात आला.

दुष्काळग्रस्तांना आर्थिक मदत, रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी, मजुरीच्या दरात वाढ, वेळेत मजुरीचे वाटप आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्याची मागणी करण्यात आली. पशुधनासाठी चारा, रेशनङ रे आवश्यक वस्तूंचा पुरवठा आणि दुष्काळग्रस्त विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करण्याची सूचनाही मांडण्यात आली. महाविद्यालयांमध्ये 'कमवा आणि शिका' योजना राबवावी आणि कंपन्यांचा सामाजिक उत्तरदायित्व निधी दुष्काळ निवारणासाठी वापरावा, अशी मागणी करण्यात आली. नाशिक जिल्ह्यातील धरणांचे पाणी नगर, नाशिक आणि मराठवाड्यातील नागरिकांसाठी राखून ठेवावे, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली. कुंभमेळ्यासाठी मोठा खर्च करणाऱ्या शासनाने दुष्काळग्रस्तांना मदत देताना हात आखडता घेऊ नये, असेही सांगण्यात आले. अध्यक्षस्थानावरून बोलताना ललित बाबर यांनी दुष्काळ हा रोजगार, शिक्षण, आरोग्य आणि अन्नसुरक्षेशी संबंधित व्यापक प्रश्न असल्याचे सांगितले. समितीच्या माध्यमातून विविध विषयांवर अभ्यासगट स्थापन करून शासनाकडे मागण्यांचा पाठपुरावा करण्यात येणार आहे. बैठकीला राज्यातील विविध जिल्ह्यांतील सुमारे ८० सामाजिक कार्यकर्ते आणि संस्था-संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



# श्रीमंतीच्या थाटात हरवला गुळाचा चहा!

## साखरेचा चहा स्वस्त, गुळाचा चहा महाग!!

## गुऱ्हाळांची परंपरा संकटात; ग्रामीण पाहुणचाराची ओळख काळाच्या पडद्याआड जाण्याची भीती

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** एकेकाळी गरिबाच्या घरातील गोडवा आणि पाहुणचाराची शान असलेला गुळाचा चहा आता साखरेच्या चहापुढे महाग ठरू लागला आहे! ज्या गुळाच्या चहाने ग्रामीण महाराष्ट्राची चव जपली, तोच चहा आज बदलती जीवनशैली, वाढत्या किमती आणि ग्राहकांच्या बदलत्या पसंतीमुळे हळूहळू मागे पडत आहे. गुळाची मिठाईही महाग होत असल्याने पारंपरिक गोडव्यावर महागाईचे सावट आले आहे. चहातील गोडवा कायम असला, तरी गुळाच्या चहाची जागा मात्र बाजाराच्या गणिताने घेतल्याचे चित्र दिसत आहे.

पूर्वी घरात पाहुणे आले की गुळाचा चहा, भाकरीसोबत गूळ आणि सणासुदीला गुळापासून तयार केलेले पदार्थ हा ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग होता. गुळाचा चहा म्हणजे केवळ पेय नव्हते, तर आपुलकीचा आणि साधेपणाचा मान होता. आज मात्र साखरेचा चहा सहज उपलब्ध आणि तुलनेने स्वस्त पडत असल्याने गुळाचा वापर कमी होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे.

एकेकाळी साखर कारखानदारीच्या विस्तारामुळे पारंपरिक गुऱ्हाळ व्यवसायावर परिणाम झाल्याची चर्चा होती. आता साखर कारखाने आणि गुऱ्हाळे सुरू असतानाही गूळनिर्मितीसमोर उत्पादन खर्च, ऊसाची उपलब्धता, बाजारभाव आणि ग्राहकांची मागणी अशी आव्हाने आहेत. गुऱ्हाळात तयार होणारा गूळ हा केवळ खाद्यपदार्थ नसून ग्रामीण रोजगाराचे साधन आणि स्थानिक अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र, हा व्यवसाय टिकविण्यासाठी आवश्यक असलेले आर्थिक गणित जुळविणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

गुळाचा चहा आणि गुळापासून तयार होणाऱ्या पारंपरिक पदार्थांची चव पुढील पिढीपर्यंत पोहोचवायची असेल, तर गुऱ्हाळ व्यवसायाला प्रोत्साहन, दर्जेदार गुळाला योग्य बाजारपेठ आणि ग्राहकांमध्ये पारंपरिक पदार्थांविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. अन्यथा, ग्रामीण संस्कृतीतील साधेपणा आणि आपुलकीची साक्ष देणारा गुळाचा चहा उद्या केवळ जुन्या पिढीच्या आठवणींत उरेल, अशी भीती व्यक्त होत आहे.

एकेकाळी गरिबाच्या घरचा गोडवा असलेला गुळाचा चहा आज महागाईच्या ताटात हरवतोय; प्रश्न फक्त चहाचा नाही, तर ग्रामीण परंपरेचा गोडवा जपण्याचाही आहे!

## धनंजय निमसे राष्ट्रवादी काँग्रेस वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या संघटनात्मक विस्ताराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण निर्णय घेत गोवर्धन उर्फ धनंजय निमसे यांची महाराष्ट्र राज्य राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाहतूक सेलच्या राज्यप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते आ. काशिनाथ दाते व आ. शिवाजीराव गर्जे यांचे उपस्थित निमसे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

गोवर्धन निमसे यांच्यावर राज्यस्तरीय जबाबदारी सोपविण्यात आल्याने वाहतूक क्षेत्रातील संघटनात्मक कामाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

यावेळी आ. शिवाजीराव गर्जे, प्रशांत गायकवाड, वसंत चेडे, संजय आहेर, संतोष चौगुले, अविनाश गोडसे आणि आदित्य नरड उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्या विचारांचा वारसा, जनसेवेची परंपरा आणि सर्वसामान्यांशी असलेली बांधिलकी पुढे नेण्याच्या उद्देशाने संघटनात्मक काम अधिक व्यापक करण्यावर पक्षाचा भर आहे.

## द•ख•ल



### स्पायर फाउंडेशनच्या राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने प्रा. सायकर सन्मानित!

**राशीन :** शैक्षणिक , सामाजिक, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यासाठी स्पायर फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' सोहळ्यात श्री रोकडेश्वर महाविद्यालय, नांदगावचे प्राचार्य मा. श्री. महादेव लक्ष्मण सायकर यांना 'राज्यस्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा रविवार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४ या वेळेत 'संजीवनी ए. सी. बँक्वेट हॉल अँड लॉन्स', नांदूर नाका, नाशिक येथे अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. प्राचार्य महादेव सायकर यांनी शैक्षणिक क्षेत्रात राबवलेले विविध उपक्रम, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांचे मोलाचे योगदान विचारात घेऊन, स्पायर फाउंडेशनने प्राप्त प्रस्तावांची छाननी करून या मानाच्या पुरस्कारासाठी त्यांची निवड केली होती. शाल, फेटा, श्रीफळ, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह (ट्रॉफी) व आकर्षक भेटवस्तू असे या पुरस्काराचे स्वरूप होते. या प्रसंगी समाज प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष व कर्जतचे प्रथम नगराध्यक्ष माननीय श्री. नामदेव देवा राऊत आणि सचिव श्री. वैभव सुकलाल छाजेड यांच्यासह शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी प्राचार्य सायकर यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. प्राचार्य महादेव सायकर यांना राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल श्री रोकडेश्वर महाविद्यालयाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, तसेच सर्वच स्तरामधून आणि नांदगाव परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दुष्काळाची कारणे आणि घ्यावयाची खबरदारी यावर रंगणार कवितांचा जागर!

**अहिल्यानगर :** दुष्काळाची कारणे, त्याचे परिणाम आणि दुष्काळी परिस्थितीत घ्यावयाची खबरदारी याविषयी जनजागृती व्हावी, तसेच नवोदित कवींच्या लेखनकौशल्याला आणि काव्यप्रतिभेला हक्काचे व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने निमगाव वाघा येथे भव्य काव्यलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डांगरे डोंगरे व्यायामशाळा, निमगाव वाघा यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दुष्काळासारख्या गंभीर सामाजिक प्रश्नावर काव्यलेखनातून जनजागृती घडवून आणणाऱ्या या उपक्रमात जास्तीत जास्त कवींनी सहभागी व्हावे, असे आवाहन डोफ्लगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांनी केले आहे. स्पर्धेसाठी 'दुष्काळाची कारणे, घ्यावयाची खबरदारी' हा विषय निश्चित करण्यात आला आहे. या विषयाच्या माध्यमातून दुष्काळामागील कारणांचा वेध घेतानाच पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाययोजना, पाण्याचे नियोजन, जलसंधारण, पावसाच्या पाण्याचे संकलन आणि पाणी बचतीचे महत्त्व कवितेतून मांडण्याची संधी स्पर्धकांना मिळणार आहे.

## जामखेड शाखेवर भाजपाचा झेंडा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जामखेड सोसायटी मतदार संघात सचिन घुमरे यांची बिनविरोध निवड झाली आहे बँकेचे इतिहासात प्रथमच जामखेड शाखेवर भाजपाचा झेंडा फडकला आहे घुमरे यांची निवड होताच बँकेच्या आवारात भाजप कार्यकर्त्यांनी झेंडा दाखवून फटाके फोडून आनंद व्यक्त केला आहे

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत विधानपरिषदेचे सभापती प्रा राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली बँकेच्या चार जागा लढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे यामध्ये जामखेड सोसायटी मतदार संघातून तरुण नेतृत्वाला संधी देत जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन घुमरे यांना संधी देण्यात आली आणि सभापती शिंदे यांनी मीच उमेदवार म्हणून सहकार्य करा असे आवाहन केले होते आणि रात्री खेळ चाले या उक्तीप्रमाणे अखेर सचिन घुमरे यांची बिनविरोध निवड झाली आणि तालुक्यात आनंदोत्सव साजरा करण्यात आला आहे निवड जाहीर होताच भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बँक आवारात एकच जल्लोष केला भाजपाचा झेंडा शाखेवर फडकवला आणि फटाके फोडून आनंद व्यक्त करण्यात आला यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती भगवान मुरूमकर रवी सुरवसे भाजपचे तालुकाध्यक्ष बापुराव ढवळे संजय काशीद नगरसेवक तात्याराम पोकळे मनोज कुलकर्णी अँड प्रवीण सानप सभापती प्रा राम शिंदे यांचे स्विय सहायक डॉ अल्ताफ शेख मनोज राजगुरू डॉ गणेश जगताप गोरख घनवट सुनिल रंधवे अँड आबा घुमरे चेअरमन जायभाय महाराज ज्ञानेश्वर अंदुरे आदी उपस्थित होते.

## श्रीगोंदा जिल्हा न्यायालयात व्याख्यान लोकअदालतीमुळे वेळ आणि पैशांची बचत

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा :** न्यायालयातील प्रलंबित खटल्यांचा निपटारा जलद गतीने करण्यासाठी आणि पक्षकारांचा वेळ व पैसा वाचवण्यासाठी मध्यस्थी हा अत्यंत प्रभावी पर्याय ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर श्रीगोंदा जिल्हा न्यायालयात तालुका विधी सेवा समिती आणि श्रीगोंदा वकील बार संघटनेच्या संयुक्त विद्यमाने 'एडीआर पद्धती आणि त्याचे फायदे' (–ऊ चशींहेवी रपव ळींी इशपशषळींी) या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मध्यस्थीचे महत्त्व, लोकअदालतीची उपयुक्तता आणि पर्यायी विवाद निवारण पद्धतींचे विविध फायदे अधोरेखित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा न्यायाधीश डी. पी. शिंगाडे उपस्थित होते. प्रमुख वक्त्या दिवाणी न्यायाधीश एस. एस. पारखले यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मध्यस्थी ही न्यायप्रक्रियेतील एक अत्यंत महत्त्वाची पायरी आहे. मध्यस्थी उपक्रम आणि लोकअदालतीच्या माध्यमातून पक्षकारांना आपले वाद सामोपचाराने मिटवता येतात. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेतील वेळ आणि पैशांची मोठी बचत होते.

याप्रसंगी २९ नोव्हेंबर २०२६ रोजी पक्षकारांच्या संमतीने वाद निकाली काढण्यासाठी 'विशेष लोकअदालत' तसेच १२ डिसेंबर २०२६ रोजी 'राष्ट्रीय लोकअदालती'चे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमादरम्यान श्रीगोंदा तालुक्यातील दोन गुणवंतांचा न्यायाधीशांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला: सुरेखा मातने: उस्ताळोड येथील मजुराच्या कुटुंबातील सुरेखा मातने हिने जिद्द, कठोर परिश्रम आणि अथक प्रयत्नांच्या जोरावर मोठे यश संपादन केले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत तिने उत्कृष्ट कामगिरी करत अखिल भारतीय आंतरविद्यापीठीय स्पर्धेसाठी निवड मिळवली. कर्नाटकातील मंगळूर येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिची निवड झाल्याबद्दल सुरेखा मातने व तिच्या कुटुंबीयांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश एस. एच. साळुंखे, सहदिवाणी न्यायाधीश, अन्य न्यायिक अधिकारी, श्रीगोंदा वकील बार संघटनेचे अध्यक्ष अॅड. जयंत शिंदे यांच्यासह अनेक वकील, पत्रकार आणि न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड. कावेरी डहाळे व अॅड. कोमल कोठींबिरे यांनी केले, तर बार संघटनेचे अध्यक्ष अॅड. जे. बी. शिंदे यांनी आभार मानले.

## शहरटाकळी जि. प. शाळा येथे स्वरा भालेराव हिचा वाढदिवस साजरा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शहरटाकळी :** शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील इयत्ता चौथीमधील विद्यार्थिनी कु. स्वरा महेश भालेराव हिचा वाढदिवस शाळेत अत्यंत कौतुकास्पद व स्तुत्य उपक्रमाने साजरा करण्यात आला. स्वरा हिच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तिच्या वडिलांनी शाळेतील 'कुसुमाग्रज वाचनालया'तील पुस्तके व्यवस्थित ठेवण्यासाठी काचेचे कपाट घेण्यासाठी ५,००० (पाच हजार रुपये) ची सढळ हस्ते आर्थिक मदत दिली. त्यांच्या या सामाजिक व शैक्षणिक बांधिलकीचे शाळेच्या वतीने विशेष आभार मानण्यात आले.

या प्रसंगी आयोजित कार्यक्रमास रामचंद्र गिरम , पत्रकार रविद्रं मडके, डॉ. महेश भालेराव, देविदास चव्हाण, गणेश धुमाळ . पोपट कोल्हे यांच्यासह मुख्याध्यापक अंकुशराव फुंदे, शिक्षक रमेश गायकवाड, रमजान शेख, राजाभाऊ इंगळे, बल्के मॅडम, निकालजे मॅडम, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

## ढोकेश्वर विद्यालयात 'आकाश कंदिल बनवा' कार्यशाळा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**टाकळी ढोकेश्वर :** श्री ढोकेश्वर विद्यालयात विद्यार्थांसाठी इको फ्रेंडली आकाश कंदिल तवार करण्याची अनोखी कार्यशाळा पार पडली आपल्या हाताने आपल्याला हवा तसा आकाशकंदिल बनवून अभिमानाने तो घराच्या दारावर टांगण्यात एक वेगळाच आनंद असतो. भारतीय संस्कृतीतील पवित्र मानल्या जाणाऱ्या दिवाळी या सणानिमित्त विद्यर्थ्यांमध्ये उपजत असणारे सुप्तगुण विकसित व्हावेत, त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा, या हेतूने इको फ्रेंडली आकाश कंदिल बनवण्याच्या कार्यशाळेचे आयोजनकेले होते. कलाशिक्षक, चित्रकार नारायण शेळके यांनी इको फेंडलीआकाश कंदिल तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले व याचे महत्व समजावून साॅगितले., विद्यथ्यानी इको फ्रेंडली वस्तूंचा वापर करून माफक खर्चामध्ये व कमी वेळेत सुंदर व आकर्षक आकाश कंदिल तयार केले. ह स्वतः तयार केलेले आकाश कंदिल विद्यर्थी आपल्या स्वतःच्या घरावर

दिवाळीच्या सणासाठी लावून हा दीपोत्सव साजरा करणार आहेत.

या कार्यशाळेत २१० विद्यार्थी उत्साहात सहभागी झाले होते, यावेळी विद्यार्थांमध्ये अतिशय आनंदमयी वातावरण निर्माण झाले होते.

यावेळी प्राचार्य बाळासाहेब खिलारी,बाळासाहेब निवडुंगे, चित्रकार व कलाशिक्षक नारायण शेळके,प्रा.अशोक गांगड,प्रा. भाऊसाहेब हिंगडे, प्रा.अतिष झावरे,प्रा.पोपळघट प्रा.महानवर,पवन कुटे, बाबासाहेब जाधव,अतुल सैद, ढोणे, प्रा.जगदाळे, प्रा.नितीन ढोकळे,निलम खिलारी,सुमन वाळुंज,वैशाली गायखे,सोनल रोहकले,महांडूळे,दिनेश वायदंडे ,विष्णु भर्द्रे,स्वप्नील कदम प्रिया डव्हणे,सुरेखा ठाणगे, खरे,शिर्के,विश्वासराव मॅडम आदी उपस्थित होते.

# मोहटादेवीच्या पालखीपुढे महिलांनी साडीच्या पदराने झाडला तीन किलोमीटरचा रस्ता

## शेकडो वर्षांची अनोखी परंपरा आजही अखंड!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी शहर :** श्रद्धेचा महासागर, भक्तीचा जागर आणि परंपरेचा अनोखा आविष्कार! आई जगदंबा मोहटादेवीच्या जयघोषाने दुमदुमलेला मोहटा गावाचा परिसर, पालखीपुढे साडीच्या पदराने रस्ता झाडणाऱ्या महिला भाविकांचे भक्तिभावाने ओथंबलेले दृश्य, जागोजागी टाकलेल्या पायघड्या, लोटांगण घालून देवीच्या चरणी नतमस्तक होणारे भाविक आणि फटाक्यांच्या आतषबाजीने भारावून गेलेले वातावरण... अशा भक्तिमय सोहळ्यात श्रीक्षेत्र मोहटा येथील मोहटादेवीची पालखी मिरवणूक उत्साहात पार पडली. सुमारे तीन किलोमीटरचा रस्ता महिलांनी स्वतः च्या साडीच्या पदराने झाडत देवीच्या पालखीला वाट करून दिली. शेकडो वर्षांपासून चालत आलेली ही अनोखी परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने जपली जात असल्याने मोहटादेवीच्या भक्तीवैभवाचा प्रत्यय पुन्हा एकदा आला.

मोहटादेवीचा नवरात्र महोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडल्यानंतर देवीच्या पालखी सोहळ्याची भाविकांना विशेष उत्सुकता असते. या सोहळ्यानिमित्त मोहटा गावात सकाळी आठ वाजल्यापासून देवीची सिंहआरूढ चांदीची मूर्ती चांदीच्या पालखीत विराजमान करून भाविकांच्या दर्शनासाठी ठेवण्यात आली होती. दिवसभर हजारो भाविकांनी पालखीचे दर्शन घेतले. सायंकाळी विधिवत आरती झाल्यानंतर वाद्यांच्या गजरात पालखी मिरवणुकीला सुरुवात झाली आणि संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले.

या सोहळ्याचे सर्वांत भावस्पर्शी वैशिष्ट्य म्हणजे महिला भाविकांनी साडीच्या पदराने पालखीपुढील रस्ता झाडण्याची परंपरा. पालखीचा मार्ग स्वच्छ करताना महिलांच्या चेहऱ्यावर दिसणारा भक्तिभाव, पालखीसमोर लोटांगण घालून व्यक्त होणारी श्रद्धा आणि रस्त्यावर पायघड्या टाकून केलेले स्वागत, हे दृश्य उपस्थित भाविकांच्या मनाला स्पर्शून गेले. फटाक्यांच्या आतषबाजीने, ढोल-ताशांच्या वाद्यगजराने आणि 'जगदंबा देवी की जय', 'रेणुका माता की जय', 'आई अंबे उदो उदो' या जयघोषांनी मोहटागडाचा परिसर दुमदुमून गेला. गावातून निघालेली पालखी पहाटे देवीगडावर पोहोचली.

माहेरवाशिणींची ओढ, ग्रामस्थांची सेवा अन् देवीवरील अढळ श्रद्धा! मोहटादेवीचा पालखी सोहळा हा केवळ धार्मिक विधी नसून मोहटा गावाच्या सांस्कृतिक आणि भावनिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. यात्रेच्या निमित्ताने गावच्या माहेरवाशिणी आवर्जून माहेरी येतात. रोजगार आणि व्यवसायानिमित्त राज्याच्या विविध भागांत वास्तव्यास असलेले ग्रामस्थही या सोहळ्यासाठी गावात दाखल होतात. आपल्या



आराध्य देवीच्या चरणी सेवा अर्पण करण्याची आणि पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या परंपरेत सहभागी होण्याची त्यांची भावना या सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त करून देते.

या वेळी देवस्थानचे विश्वस्त बाबासाहेब दहिफळे, शुभम दहिफळे, अशोक दहिफळे, शशिकांत दहिफळे, राजेंद्र शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश भनगे, जनसंपर्क अधिकारी भीमराव खाडे यांच्यासह मोहटा ग्रामस्थ, महिला आणि हजारो भाविक उपस्थित होते.

शतकांची परंपरा, भक्तीची अखंड ज्योत आणि मोहटादेवीच्या चरणी समर्पित भावविश्व!

महिलांनी पदराने झाडलेला पालखीचा मार्ग आणि भाविकांनी केलेला जयघोष यांतून मोहटादेवीवरील श्रद्धेचे दर्शन घडले. काळ बदलला, पिढ्या बदलल्या; मात्र आई मोहटादेवीच्या भक्तीची परंपरा आजही अखंड सुरू आहे. हाच या पालखी सोहळ्याचा खरा महिमा!

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार, दि.२३ ऑक्टोबर २०२६ | पान ८

## गुवाहाटीला पाठविलेला १२ लाखांचा कांदा ट्रकसह गायब

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील कांदा व्यापाऱ्याने गुवाहाटी येथे पाठविलेला ५७५ गोण्या कांद्याने भरलेला ट्रक वाटेतच गायब झाल्याची घटना उघडकीस आली आहे. कांद्याची किंमत १२ लाख रुपये असून, ट्रकचालकाला दिलेल्या १६ हजार ४०० रुपयांसह एकूण १२ लाख १६ हजार ४०० रुपयांच्या मालाचा अपहार झाल्याची फिर्याद राहुरी पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. या घटनेमुळे व्यापारी वर्गात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी वांबोरी येथील कांदा व्यापारी अक्षयकुमार सुरेशचंद मुथ्था (वय ४८) यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, १२ ऑक्टोबर २०२६ रोजी ट्रक क्रमांक आरजे १४ जीपी ५७७९ मध्ये वांबोरी व राहुरी येथून एकूण ५७५ गोण्या कांदा भरून गुवाहाटी येथे पाठविण्यात आला होता. मात्र, १७ ऑक्टोबरपर्यंत हा ट्रक निर्धारित ठिकाणी पोहोचला नाही. व्यापारी मुथ्था यांनी ट्रकचालकाशी अनेकदा संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, चालकाचा भ्रमणध्वनी बंद येत असल्याने त्यांना संशय आला. त्यानंतर त्यांनी राहुरी पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. या फिर्यादीवरून ट्रकचालक वारिश दिन मोहम्मद खान (रा. बिशंभरा, जि. मथुरा, उत्तर प्रदेश) आणि मोहम्मद इरशाद उसमान खान (रा. सालाहरी, मेवाट, हरियाणा) या दोघांविरुद्ध गुन्हा रजिस्टर क्रमांक ११७९/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ३१६(३) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. गायब झालेला ट्रक आणि कांद्याचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये एक लाख भगवे ध्वज फडकणार!

## 'हर घर भगवा' अभियानाला २५ ऑक्टोबरपासून प्रारंभ

## इंदूर, अहिल्यानगरसह विविध शहरांतून ध्वजांची आवक सुरु




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाशिक** : आगामी नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणनिर्मितीसाठी 'हर घर भगवा' हे व्यापक अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत नाशिक शहरात ७५ हजार, तर त्र्यंबकेश्वरमध्ये २५ हजार असे एकूण एक लाख भगवे ध्वज घरांवर फडकविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर २५ ऑक्टोबर रोजी या अभियानाचा शुभारंभ होणार असून, इंदूर, अहिल्यानगर, धुळे आणि जळगाव येथून ध्वज नाशिकमध्ये पोहोचण्यास सुरुवात झाली आहे.

कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याच्या निमित्ताने हे अभियान राबविण्यात येत आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये येणाऱ्या भाविकांच्या स्वागतासाठी भक्तिमय वातावरण निर्माण करणे आणि नागरिकांचा सहभाग वाढविणे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दोन हजारांहून अधिक बूथप्रमुख सक्रिय करण्यात येणार आहेत. नाशिक शहरात भारतीय जनता पक्षाचे १,०४७, तर शिवसेनेच्या शिंदे गटाचे एक हजार बूथप्रमुख या अभियानात सहभागी होणार आहेत. आमदार आणि नगरसेवकांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध भागांत ध्वज वितरणाचे नियोजन करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, अभियानासाठी आवश्यक ध्वजांची निर्मिती आणि वितरण करण्यासाठी विविध शहरांत यंत्रणा उभारण्यात आली आहे. इंदूर, अहिल्यानगर, धुळे आणि जळगाव येथून ध्वज नाशिकमध्ये दाखल होत आहेत. त्यामुळे अभियानाच्या तयारीला वेग आला आहे.

सिंहस्थ कुंभमेळा हा भारतीय संस्कृती, धार्मिक परंपरा आणि आध्यात्मिक वारशाचे दर्शन घडविणारा महत्त्वपूर्ण सोहळा आहे. देशभरातून लाखो भाविक आणि साधू-महंत नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये येण्याची अपेक्षा असल्याने शहरात उत्सवी वातावरण निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. कुंभमेळामंत्री तथा नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून हे अभियान राबविण्यात येत आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर भगवा ध्वज लावून या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महाजन यांनी केले आहे.

# कांदा बाजारात आवक १.४० लाख क्विंटलवर!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : राज्यातील कांदा बाजारात गुरुवारी (दि. २२ ऑक्टोबर) एकूण १ लाख ४० हजार ३५५ क्विंटल कांद्याची आवक झाली. उन्हाळी कांद्याची सर्वाधिक ६८ हजार २६७ क्विंटल आवक झाली असून, लाल कांद्याची आवक २८ हजार ९३ क्विंटल होती. अहिल्यानगर बाजार समितीत उन्हाळी कांद्याची १८ हजार ८१७ क्विंटल आवक नोंदविण्यात आली. येथे उन्हाळी कांद्याला किमान १ हजार, कमाल ४ हजार ६०० आणि सरासरी २ हजार ८०० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला.

कृषी पणन मंडळाच्या माहितीनुसार, लाल कांद्याच्या सोलापूर बाजारात सर्वाधिक आवक झाली. येथे २३ हजार ८३५ क्विंटल कांद्याची आवक झाली असून, किमान ५००, कमाल ७ हजार ३०० आणि सरासरी ३ हजार रुपये दर मिळाला. अहिल्यानगरमध्ये लाल कांद्याला सरासरी ३ हजार १५० रुपये, तर धुळे बाजारात ३ हजार ८२० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. नागपूरमध्ये लाल कांद्याचा सरासरी दर ४ हजार २५० रुपये होता.

उन्हाळी कांद्याला पिंपळगाव बसवंत येथे सरासरी ४ हजार २०० रुपये, सिन्नरमध्ये ४ हजार ५० रुपये, कळवणमध्ये ३ हजार ९०० रुपये, नाशिकमध्ये ३ हजार ८५० रुपये आणि चांदवडमध्ये ३ हजार ८५४ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. संगमनेर बाजारात सरासरी ३ हजार १५० रुपये, तर नेवासा येथे ३ हजार ५०० रुपये दर नोंदविण्यात आला. भुसावळ बाजारात आवक केवळ सात क्विंटल असताना सरासरी चार हजार रुपये दर मिळाला.

पांढऱ्या कांद्याला नागपूर बाजारात सरासरी ५ हजार २५० रुपये दर मिळाला. लोकल कांद्याला पुणे बाजारात सरासरी २ हजार ७५० रुपये, तर सांगलीत ३ हजार रुपये दर मिळाला. बाजार समित्यांमधील आवक आणि कांद्याच्या प्रतवारीनुसार दरांमध्ये फरक दिसून आला. त्यामुळे शेतकऱ्यांनी विक्रीपूर्वी संबंधित बाजार समितीतील ताजे दर तपासावेत.

# घरकुल प्रकरण रखडवल्याने ग्रामपंचायत कार्यालयाला ठोकले कुलूप




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : गेल्या आठ ते दहा वर्षापासून ग्रामपंचायत प्रशासनाने जाणूनबुजून घरकुल प्रकरण रखडून ठेवल्याचा आरोप करत बबन कोळपे यांनी ग्रामपंचायत प्रशासनाच्या कारभारावर संतप्त होऊन ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप ठोकले. जोपर्यंत मला न्याय मिळत नाही, तोपर्यंत कुलूप उघडणार नाही, असा आक्रमक पवित्रा कोळपे यांनी दिला. बबन तुळशीराम कोळपे, रा. मोमीन आखाडा, ता. राहुरी, यांनी पंचायत समिती येथील गटविकास अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे कि, मोमीन आखाडा ग्रामपंचायतीच्या घरकुल योजनेतील गेल्या आठ ते दहा वर्षांपासून घरकुल मिळवुन देण्यास टाळाटाळ केल्याच्या अनियमितते प्रकरणी पंचायत समिती प्रशासनाकडे लेखी तक्रार करण्यात आली होती.

घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची माहिती, घरकुल मंजुरी व अपूर्ण कामांसह विविध मुद्द्यांवर चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात तक्रारदारांनी घरकुल योजनेच्या अंमलबजावणी बाबत अनेक प्रश्न उपस्थित केले. सन २०१६-२०१७ मधील ऑनलाइन प्रिंट व लाभार्थ्यांची माहिती, घरकुल मंजूर झालेल्या तसेच अपूर्ण राहिलेल्या कामांचा तपशील आणि सन २०२१-२०२२ पर्यंतच्या कामकाजाची पडताळणी करण्यात यावी. घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला आहे का, मंजूर कामे पूर्ण झाली आहेत का, तसेच ग्रामपंचायत स्तरावर संबंधित कामकाजाची योग्य अंमलबजावणी झाली आहे का, याची तपासणी करावी. बबन कोळपे, यांनी यापूर्वी संबंधित अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले. मात्र अद्याप न्याय मिळाला नसल्याचा आरोप केला.

त्यामुळे मोमीन आखाडा ग्रामपंचायतीच्या कामकाजाची सखोल चौकशी करून घरकुल योजनेतील कथित गैरव्यवहार उघड करावेत आणि दोषींवर नियमानुसार कारवाई करावी. जो पर्यंत या तक्रारीची चौकशी होत नाही तो पर्यंत ग्रामपंचायत कार्यालयाला लावलेले कुलूप उघडू नये. यापुढे माझ्या जीवितास धोका निर्माण झाल्यास सर्वस्वी ग्रामपंचायत प्रशासन जबाबदर राहील, असे बबन तुळशीराम कोळपे यांनी तक्रारीत म्हटले आहे.

# सोनईतील सैय्यद यांच्या सॉमिलला भीषण आग; १३ लाखांचे नुकसान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिंगणापूर** : सोनई-कांगोणी रस्त्यावरील सैय्यद यांच्या सॉमिलला गुरुवारी पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास भीषण आग लागली. या आगीत सॉमिलमधील लहान-मोठ्या मशिनरी, लाकूड आणि अन्य साहित्य जळून खाक झाले. या दुर्घटनेत सैय्यद कुटुंबाचे अंदाजे १३ लाख २१ हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

सोनई गावालगत असलेल्या सॉमिलला गुरुवारी पहाटे अचानक आग लागल्याचे निदर्शनास आले. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केल्याने सॉमिलमधील मशिनरी, लाकडाचा साठा आणि इतर साहित्य आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आगीची तीव्रता अधिक असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले. मात्र, तोपर्यंत सॉमिलमधील मोठ्या प्रमाणातील साहित्य जळून खाक झाले होते.

दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर सोनईचे तलाठी गणेश आगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन नुकसानीचा पंचनामा केला. पंचनाम्यात झालेल्या नुकसानीची नोंद घेण्यात आली असून, अहवाल तहसीलदारांकडे पाठविण्यात येणार असल्याची माहिती आहे.

सॉमिलला आग नेमकी कशामुळे लागली, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. विद्युत बिघाडामुळे आग लागली की अन्य कारणामुळे ही दुर्घटना घडली, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाल्याने नुकसानग्रस्त सैय्यद कुटुंबाला प्रशासनाकडून मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# त्रिमूर्ती संकुलात राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचे उद्घाटन | राज्यातून शेकडो मल्लांची हजेरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : नेवासा फाटा येथील क्रीडा व युवक सेवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित श्री. दादासाहेब हरिभाऊ घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मुकिंदपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेचे उदघाटन दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता मोठ्या उत्साहाच्या वातावरणात पार पडले.यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शेकडो विद्यार्थी मल्ल सहभागी झाले होते.



स्पर्धेच्या उदघाटन सोहळ्यासाठी आलेल्या मान्यवरांचे संस्थेच्या मध्यवर्ती प्रवेश कक्षात ढोल-ताशांच्या गजरात व फटाक्यांच्या आतषबाजीत जंगी स्वागत करण्यात आले. क्रीडा व युवक सेवा संचलनालयाचे उपसंचालक युवराज नाईक, प्रांताधिकारी सुधीर पाटील, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ड.सुमतीताई घाडगे पाटील,हिंदकेसरी पै.योगेश दोडके, पै.संदीप आप्पा भोंडवे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे,शिवछत्रपती पुरस्कार विजेते दिनेश गुंड,संस्थेच्या उपाध्यक्षा ड. स्नेहल चव्हाण - घाडगेपाटील, कार्यकारी अधिकारी डॉ.गौरव प्रा.डॉ. संतोष भुजबळ,प्राचार्य सोपान काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले या प्रसंगी निलेश मदने,माजी तालुका क्रीडा अधिकारी शरद कचरे, प्राचार्या दिपाली बाविस्कर, उपप्राचार्य शांतीलाल मेहेत्रे,क्रीडा समन्वयक व आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच संभाजी निकाळजे ,विभाग प्रमुख नामदेव ताके, जितेंद्र पाटील, मिलिंद सोनवणे, क्रीडा शिक्षक छबुराव काळे,अशोक पानकडे, साहेबराव दाणे, महादेव काकडे, संदीप वाघमारे, विजय गायके, गणेश शिंदे, अमीर शेख,निलेश पैठणे उपस्थित होते.

या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील आठही विभागांमधून (पुणे, मुंबई, नागपूर, अमरावती, नाशिक, लातूर, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर) १४ व १९ वर्षे वयोगटातील कुस्तीपटूंनी आपल्या प्रशिक्षकांसह हजेरी लावली आहे. राज्यभरातून आलेल्या मल्लांमुळे त्रिमूर्तीनगरीत कुस्तीचा माहोल निर्माण झाला आहे.

उदघाटन समारंभात मान्यवरांच्या हस्ते शिक्षणमहर्षी साहेबरावजी घाडगेपाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सर्व खेळाडूंना शुभेच्छा देत, खेळाडूवृत्तीने खेळ खेळून आपल्या विभागाचे व राज्याचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन केले. ही स्पर्धा येत्या दोन दिवस चालणार असून, यातून राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड केली जाणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व त्रिमूर्ती शैक्षणिक संकुला सर्व शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी परिश्रम घेत आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक गाडे यांनी केले.

# घोगरे यांची याचिका फेटाळली

## सुजय विखे पाटील यांचा जिल्हा बँकेतील मार्ग मोकळा




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उमेदवारीला आव्हान देणारी एकनाथ घोगरे यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे राहाता सेवा संस्था मतदारसंघातून जिल्हा बँकेच्या संचालकपदी झालेल्या डॉ. विखे पाटील यांच्या बिनविरोध निवडीवरील न्यायालयीन आव्हान दूर झाले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी डॉ. सुजय विखे पाटील यांनी राहाता सेवा संस्था मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला होता. त्यांच्या उमेदवारीवर विरोधी उमेदवार एकनाथ घोगरे यांनी हरकत घेतली होती. मात्र, निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनी ही हरकत फेटाळली. या निर्णयाला घोगरे यांनी उच्च न्यायालयात याचिकेद्वारे आव्हान दिले होते.

या याचिकेवर न्यायमूर्ती मंजुषा अजय देशपांडे यांच्यासमोर अंतिम सुनावणी झाली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने घोगरे यांची याचिका फेटाळून लावली. त्यामुळे डॉ. विखे पाटील यांच्या उमेदवारीविरोधातील न्यायालयीन लढ्याला पूर्णविराम मिळाला आहे. या प्रकरणात डॉ. सुजय विखे पाटील यांच्या वतीने ॲड. विनायक होन आणि ॲड. अभय ओस्तवाल यांनी बाजू मांडली. महाराष्ट्र शासनाच्या वतीने ॲड. सुभाष तांबे, तर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या वतीने ॲड. साहेबराव कदम यांनी काम पाहिले.

या निकालामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील महत्त्वाच्या न्यायालयीन प्रकरणाचा निकाल लागला असून, डॉ. विखे पाटील यांच्या संचालकपदाच्या बिनविरोध निवडीवरील आव्हान दूर झाले आहे. जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील या घडामोडीकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते.

# पोलीस कॉन्स्टेबला सहआरोपी करण्याची मागणी

## मृतदेहासह नातेवाईकांचा पोलीस ठाण्यात ठिय्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे चुलता-पुतण्याच्या वादातून झालेल्या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या विलास मोकाटे यांचा तब्बल २० दिवसांच्या उपचारांनंतर मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, मृत्यूची माहिती मिळताच नातेवाईकांनी आक्रमक भूमिका घेत मृतदेहासह राहुरी पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले. संबंधित आरोपींना तातडीने अटक करावी, तसेच पोलीस कॉन्स्टेबल सचिन ठोंबरे यांना या गुन्ह्यात सहआरोपी करावे, अशी मागणी नातेवाईकांनी केली.

राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी येथे चुलता-पुतण्यामध्ये किरकोळ कारणावरून वाद होऊन मारहाणीची घटना घडली होती. या मारहाणीत विलास मोकाटे गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर गेल्या २० दिवसांपासून उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या मृत्यूमुळे प्रकरणाचे गांभीर्य वाढले असून, संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांनी केली आहे.

विलास मोकाटे यांच्या मृत्यूनंतर दाखल गुन्ह्यात खुनाचे वाढीव कलम लावण्यात आले आहे. मात्र, आरोपींना अद्याप अटक न झाल्याने नातेवाईकांनी संताप व्यक्त केला. आरोपींना तातडीने अटक करावी आणि पोलीस कॉन्स्टेबल सचिन ठोंबरे यांची भूमिका तपासून त्यांनाही सहआरोपी करावे, या मागण्यांसाठी नातेवाईकांनी मृतदेहासह राहुरी पोलीस ठाण्यात ठिय्या आंदोलन केले.



या आंदोलनादरम्यान पोलिसांकडून आरोपींना अटक करण्याबाबत तसेच संबंधित पोलीस अंमलदाराच्या भूमिकेची चौकशी करण्याबाबत आश्वासन देण्यात आले.

चार दिवसांत आरोपींना पकडण्यात येईल, तसेच चौकशीत पोलीस अंमलदार दोषी आढळल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन मिळाल्यानंतर नातेवाईकांनी मृतदेह हलवला.मात्र, केवळ आश्वासनावर समाधान न मानता नातेवाईकांनी पोलिसांना आठ दिवसांची मुदत दिली आहे. या कालावधीत आरोपींना अटक झाली नाही, तर पुन्हा रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. त्यामुळे या प्रकरणातील पुढील पोलीस कारवाईकडे ब्राम्हणीसह राहुरी तालुक्याचे लक्ष लागले आहे.